बी.एम. प्रतिष्ठान
बी. एम. प्रतिष्ठान
महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष
बाळासाहेब भगवानराव मस्के

दैनिक बीड
पुण्यभूमी
संपादकःबाळासाहेब मस्के

बी.एम. प्रतिष्ठान
बी. एम. प्रतिष्ठान
महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष
बाळासाहेब भगवानराव मस्के

बीड | शनिवार,दि.१४ डिसेंबर २०२४ | वर्षे४रे | अंक१२८वा | पाने ६ | दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... पुण्यभूमी | https://Paper.epunyabhumi.in | RNI No : MAHAMAR/2021/81902 | ₹ ३

७५ लाख मते कशी वाढली?

ॲड. प्रकाश आंबेडकर यांचा सवाल | **वंचितने पाठवलेल्या पत्राला आरओकडून सरकारी उत्तर** | **EVM संदर्भात सर्वपक्षीय बोलविणार एक बैठक** | **EVM विरोधात आता जनतेनेही विचार करावा**

मुंबई/पुण्यभूमी प्रतिनिधी

EVM संदर्भात आम्ही सर्व राजकीय पक्षांशी बोलणार आहोत आणि EVM संदर्भात एक बैठक बोलवणार आहोत. आम्ही मुख्य निवडणूक आयुक्तांशी आणि आर. ओ. यांच्याशी पत्रव्यवहार केला. परंतु, मुख्य निवडणूक आयुक्तांनी अद्याप आम्हाला उत्तर दिलेलं नाही. काही आर. ओ यांनी सरकारी उत्तरे दिली आहेत. पण ७५ लाख मते कशी वाढली याचे उत्तर मिळालेले नाही असे वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी म्हटले आहे.

ॲड. आंबेडकर यांनी म्हटले आहे की, आम्ही लिहिलेल्या पत्रातील मुद्दे महत्वाचे आहेत. त्यातील पहिला मुद्दा २० तारखेला मतदान किती झाले याची आकडेवारी आणि २३ तारखेला सर्व मतदान जेव्हा मोजण्यात आले त्याची आकडेवारी निवडणूक आयोगाने द्यावी अशी मागणी आम्ही केली आहे. २० तारखेला निवडणूक आयोगाच्या संकेतस्थळावर जी माहिती टाकण्यात आली आहे. त्यामध्ये संध्याकाळी सहानंतर ७५ लाख मतदान झाले आहे असे सांगण्यात आले आहे. याबाबत आम्ही प्रश्न उपस्थित केला आहे.

सायंकाळी सहानंतर किती मतदान झाले याची आकडेवारी निवडणूक आयोगाने द्यावी. संध्याकाळी सहा वाजता जे रांगेत होते या सगळ्यांना आपण पोलिंग बूथ वाईज स्लीप वाटली असेल, तर त्या किती वाटल्या याची माहिती द्या, कोणत्या अधिकारात आपण या स्लीप वाटल्या आहेत याबाबत माहिती द्या अशी मागणी आम्ही पत्र पाठवून निवडणूक आयोगाकडे केली असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

नांदेड दक्षिण, औरंगाबाद पश्चिम आणि परंडा येथील आरओनी आमच्या पत्राला सरकारी पद्धतीची उत्तरे दिली आहेत. त्यातील समान भाग म्हणजे सदर माहिती दैनंदिन लिफाफामध्ये सील बंद करून सुरक्षा कक्षात जमा करण्यात आली आहे. त्यामुळे याबाबत आपल्याला माहिती उपलब्ध करून देणे शक्य नाही. असे आर. ओ यांनी उत्तरे दिल्याचे आंबेडकर यांनी स्पष्ट केले आहे.

पान २ वर...

तर निवडणुकीला काही अर्थ उरणार नाही

आम्हाला मिळालेले उत्तर आम्ही इतर पक्षांना देखील पाठवणार आहोत. आपल्यातील जे राजकीय मतभेद आहेत ते आपण बाजूला ठेवले पाहिजेत. जर आपण ते बाजूला ठेवले नाही आणि अशाच रीतीने मतदान होणार असेल त्याला काहीही अर्थ राहत नसल्याचे ॲड. आंबेडकर यांनी म्हटले आहे.

वाल्मिक कराड यांच्यावरील गुन्हा मागे घ्या

आंदोलन:महायुतीकडून पोलीस प्रशासनास निवेदन

परळी/पुण्यभूमी प्रतिनिधी

केज तालुक्यातील सामाजिक कार्यकर्ते स्वर्गीय संतोष देशमुख यांची निर्घृण हत्या करणाऱ्या मारेकऱ्यांचा तातडीने शोध घेऊन त्यांना अटक करावे तसेच त्यांच्यावर जलद गती न्यायालयात खटला चालवून त्यांना कठोरात कठोर शासन करावे; त्याचबरोबर परळीचे माजी नगराध्यक्ष तथा ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते वाल्मिक कराड यांच्यावर राजकीय अकसातून लावण्यात आलेला खंडणीचा खोटा गुन्हा तात्काळ मागे घेण्यात यावा अन्यथा तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा आज परळी महायुतीच्या वतीने पोलीस प्रशासनास निवेदनाच्या माध्यमातून देण्यात आला आहे.

महायुतीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी आज परळी शहर पोलीस ठाण्यात याबाबतचे निवेदन सादर केले आहे. केज तालुक्यातील स्व.संतोष देशमुख यांची झालेली निर्घृण हत्या ही मानवतेला काळिमा फासणारी आहे, या दुर्दैवी घटनेतील उर्वरित आरोपींना तात्काळ जेरबंद करण्यात यावे, तसेच ज्येष्ठ नेते वाल्मिक कराड यांच्यावर अवादा एनर्जी कंपनीच्या माध्यामातून राजकीय अकसातून लावण्यात आलेला खंडणीचा खोटा गुन्हा रद्द करण्यात यावा, अशी मागणी या निवेदनाद्वारे करण्यात आली असून, याबाबत तीव्र

पान २ वर...

आंबेडकरी वस्त्यातील कोंबिंग ऑपरेशन थांबवा

आक्रमक:परभणी घटनेच्या संदर्भात रिपाइंचे आंदोलन

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

परभणी शहरातील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर असलेल्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा येथे एका माथेफीरुने संविधान प्रतीचा अवमान केला आहे. त्यामुळे संबंध देशवासीयांच्या भावना दुखावल्या आहेत.

तसेच मसाजोग येथील सरपंच देशमुख यांच्या हत्येतील आरोपीस फाशीची शिक्षा देण्यात यावी या दोन्ही घटनेच्या निषेधार्थ बीड रिपाइं मध्यवर्ती कार्यालयापासून बीड जिल्हाधिकारी पर्यंत जाऊन निदर्शने करण्यात येऊन त्यांना शुक्रवार (ता.१३) रोजी निवेदन सादर करण्यात आले. सदरील आंदोलन रिपाइंचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा मंत्री रामदास आठवले, युवा रिपाई प्रदेश अध्यक्ष तथा बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांच्या मार्गदर्शनाखाली, रिपाइं सरचिटणीस राजू जोगदंड यांच्या उपस्थितीत व रिपाईचे धडाडीचे क्रियाशील तालुका अध्यक्ष किशन तांगडे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले.

बीड जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की भारतीय संविधान प्रतीचा अवमान करणाऱ्या माथेफिरु आरोपीला कठोर शिक्षा करण्यात यावी, तसेच परभणी पोलिसांकडून आंबेडकरी वस्त्यांमध्ये कोंबिंग ऑपरेशन सुरू आहे ते कोंबिंग ऑपरेशन तात्काळ थांबविण्यात यावे. देशाच्या सर्वोच्च स्थानी भारतीय संविधान आहे. या संविधानाचा कोणी अवमान करत असेल तर त्याच्या विरोधात कोणत्याही प्रकारची गय केली जाऊ नये. भारतीय संविधान देशातल्या प्रत्येक व्यक्तीला संरक्षण देण्याचे काम करते. जर कोणी त्याचा अवमान करत असेल तर प्रशासनाने देखील ही बाब गंभीरतेने घेणे गरजेचे आहे. भारतीय संविधानाचा अवमान करणाऱ्या माथेफिरुच्या विरोधात कठोर कारवाई व्हावी. अशी मागणी निवेदनात करण्यात आली.

पान २ वर...

शिक्षक खून प्रकरणात १२ आरोपींना अजन्म कारावास

बीड मोक्का विशेष न्यायालयाचा निकाल

बीड/प्रतिनिधी: येथील बहुचर्चित शिक्षक साजेद अली खून प्रकरणात बीड मोक्का विशेष न्यायालयाने १२ आरोपींना शुक्रवारी (दि.१३) अजन्म कारावास आणि प्रत्येकी १ लाखाची शिक्षा सुनावली. तर, उर्वरित दोघांपैकी एकाला ६ महिने तर एकाला ५ वर्षांची शिक्षा सुनावली गेली. न्या. एस. आर. पाटील यांनी हा निकाल दिला. न्यायालयाने यापूर्वीच या प्रकरणातील १४ जणांना दोषी ठरवले होते. सरकारी पक्षाच्या वतीने विशेष सरकारी वकील ड.अजय तांदळे यांनी युक्तीवाद केला होता.

बीड येथील सैनिकी विद्यालयात कार्यरत शिक्षक सय्यद साजेद अली (३८) यांना आरोपी गुज्जर खान याने सन २०१३ मध्ये खंडणीची मागणी केली होती. अली यांनी खंडणीस नकार दिल्यानंतर

पान २ वर...

प्रत्यक्षदर्शींची साक्ष ठरली महत्वाची

सरकारी पक्षाकडून या प्रकरणात ४४ साक्षीदार तपासले गेले तर बचाव पक्षातर्फे ५ साक्षीदार तपासण्यात आले. फिर्यादीसह ३ प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, परिस्थितीजन्य पुरावा, वैद्यकीय पुरावा, न्याय वैद्यकीय प्रयोगशाळेचा अहवाल आणि सरकारी पक्षाचा युक्तीवाद यात महत्वाचा ठरला.

या १२ जणांना अजन्म कारावास

अन्वर खान उर्फ गुज्जरखान मिर्झा खान (रा. गुलशन नगर,बीड), मुजीबखान मिर्झाखान पठाण, सय्यद नासेर सय्यद नुर, सय्यद शाहरूख सय्यद नुर, शेख उबेद शेख बाबू,शेख सर्फराज उर्फ सरूडॉन, शेख शहबाज शेख कलीम (रा. रोशनपुरा), शेख अमर शेख अकबर (रा.गुलशन नगर बीड), शेख बबर शेख युसूफ (रा. खासबाग,बीड),आवेज काझी (रा.काझी नगर,बालेपीर, बीड), शेख इमरान उर्फ काला शेख रशीद (रा.काझी नगर,बालेपीर बीड) व शेख मझहर उर्फ काल्या उर्फ हाफ मर्डर शेख रहीम (रा.बांगर नाला, बीड) या १२ जणांना विशेष मोक्का न्यायालयाने अजन्म कारावास व प्रत्येकी १ लाखांचा दंड ठोठावला असल्याची माहिती विशेष सरकारी वकील अजय तांदळे यांनी दिली

संतोष देशमुख हत्या प्रकरण बीड जिल्हा कडकडीत बंद!

व्यापाऱ्यांनी आपले दुकान बंद ठेवून केला निषेध व्यक्त! | आ. संदिप क्षिरसागर यांची शहरात बाईक रॅली

बीड/प्रतिनिधी

पवनचक्की खंडणी व अपहरण करत मस्सा जोग येथील युवा नेते तथा सरपंच पती संतोष देशमुख यांची निर्गुण हत्या करण्यात आली. बीड जिल्ह्यात या हत्या विरोधात संतापाची लाट उसळली. विविध स्तरातून या हत्याचा निषेध व्यक्त करण्यात आला. दिनांक १३ रोजी विविध संघटनांनी बीड जिल्हा बंदची हाक दिली होती. जिल्ह्यातील व्यापाऱ्यांनी या बंदला प्रतिसाद देत १००% बंद पाळला जिल्ह्यात कडकडीत बंद पाळण्यात आल्यामुळे या घटनेमुळे जिल्ह्यात सामान्यात रोष व्यक्त करण्यात येत असून व्यापारी वर्ग तसेच व्यावसायिकही सुरक्षित नसल्याचे भावना व्यक्त करण्यात येत आहे.

केज तालुक्यातील मस्साजोग गावचे सरपंच पती आणि सामाजिक कार्यकर्ते स्व. संतोष देशमुख यांच्या अपहरणानंतर निघृण हत्येच्या घटनेने बीड जिल्ह्यात संतापाची लाट उसळली आहे. या निषेधार्थ शुक्रवारी (दि. १३) बीड जिल्हा बंदची हाक देण्यात आली होती, ज्याला व्यापारी,

पान २ वर...

चर्चेतले | सरपंच अन्वर पट्टेदारांची तक्रार

...म्हणून ग्रामसभा करावी लागली रद्द

सिरसाळा/पुण्यभूमी प्रतिनिधी

पत्रा द्वारे कळवूनही ग्रामसेवक व विस्तार अधिकारी गैरहजर राहिल्याने सिरसाळ्याची ग्रामसभा रद्द करावी लागली आहे . या प्रकरणी सरपंच अन्वर पट्टेदार यांनी बीड मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या कडे धाव घेत तक्रार केली आहे गावचे अनेक विकासात्मक प्रश्न मार्गी लावण्यासाठी ग्रामसभा होणे खुप आवश्यक आहे . परंतु सिरसाळा ग्रामपंचायत ला ग्रामसेवक न येऊ देणे असे कुटील राजकीय डावपेच करुन वेठीस धरण्याचे काम केले जात आहे .

गेल्या सहा महिन्यांपासून सिरसाळा ग्रामपंचायत ला नियमित ग्रामसेवक नाही . जो कुणी नियुक्त होतो तो चार आठ दिवस पदभार घेऊन पुन्हा पळ काढतो किंवा काही निमित्त सांगून रजेवर जातो . या मुळे गावाची व गावातील नागरिकांची कामे होत नाहीत. सरपंच अन्वर पट्टेदार यांनी वरिष्ठ प्रशासनास अनेक वेळा कळवून देखील यावर काहि कार्यवाही केली जात नाही . दोन दिवसापुर्वी दिनांक ११ डिसेंबर रोजी ची ग्रामसभा ग्रामसेवक व विस्तार अधिकारी यांच्या गैरहजेरी मुळे रद्द करावी लागली आहे. सभेचा अजेंडा दिनांक २ डिसेंबर रोजीच काढून या संबधि गटविकास अधिकारी/पंचायत समिती कार्यालयात यांना पत्रव्यवहार करून कळवले होते. परंतु कसलीही दखल घेतली गेली नाही. ग्रामसेवक नाही आले तर विस्तार अधिकारी यांनी उपस्थित रहायला हवे होते . परंतु पत्राद्वारे अवगत करुन देखील ग्रामसेवक व विस्तार अधिकारी उपस्थित राहिले नाहीत. दिनांक १८ नोव्हेंबर पासुन ग्रामसेवक सिरसाळ्यात हजर नाहीत, त्या मुळे गावची व लोकांची कामे

पान २ वर...

देणंघेणं नसलेला निर्दयी लोकप्रतिनिधी?

काय म्हणावं: केज दुःखात असतांना नमिता सत्कारात व्यस्त

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

आज बीड जिल्ह्यात काळीमा फासणाऱ्यां घटनेचे दुःख व्यक्त करत बीड जिल्हा बंद पाळला होता परंतु केज अंबाजोगाई विधानसभा मतदारसंघाच्या विद्यमान आमदार आमदारा लोकप्रतिनिधी असताना सत्कार स्वीकारण्यात व्यस्त होत्या हे शोभतय का आमदारा नमीता लोखंडे तुम्हाला असा प्रश्न नागरिकांना पडला आहे.भारतीय संविधानाची तोडफोड विटंबना मुळे परभणी जिल्हा सह महाराष्ट्रभर संविधान प्रेमी आणि अनुयायी यांच्या प्रचंड भावना दुखावल्या आहेत.सर्वत्र निषेध होत आहे.

तसेच मानुस्कीला काळीमा फासणारी घटना बीड जिल्ह्यात केज तालुक्यात मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांची निर्घृणपणे हत्या झाली आहे. सर्वत्र दोन्ही घटने मुळे हळहळ आणि निषेध व्यक्त होत असताना . केज मतदासंघांचे विद्यमान आमदार स्वा.रा.ती.ग्रा. शासकिय रुग्णालय व

पान २ वर...

'ड्युरेबल ऑप्टिमिस्ट'

माधव गाडगीळ यांच्यासारख्या 'तापहीन मार्तंड' व्यक्तीची महती सद्या:स्थितीत एका वाक्यात विशद करता येईल. ''अर्बन नक्षल न ठरवला गेलेला पर्यावरणवादी'' या एका विधानात गाडगीळ यांच्या कार्याचे तसेच व्यक्तिमत्त्वाचे महत्त्व अधोरेखित होते. भारतासारख्या अर्धविकसित देशात जेथे विकास ही संकल्पनादेखील जात वा धर्माच्या किंवा उजवे की डावे या नजरेतून पाहिली जाण्याचा धोका असतो, त्या देशात पर्यावरणवादी असणे सोपे नाही. गाडगीळ यांचे दुर्मीळ वैशिष्ट्य असे की त्यांना 'उजवे'ही मानतात आणि 'डाव्यां'च्या प्रकाशनांतूनही त्यांचे लिखाण नियमितपणे प्रसिद्ध होत असते. असे दोन्ही बाजूस आदरणीय असणे कमालीचे अवघड. तथापि या उभय-पंथी आदरास पात्र ठरावे म्हणून कोणत्याही युक्त्या, बोटचेपेपणा गाडगीळ यांनी कधी केला नाही. हे अधिक दुर्लभ. अशा या माधव गाडगीळ यांस संयुक्त राष्ट्रांच्या पर्यावरणविषयक विभागाने 'चॅम्पियन्स ऑफ द अर्थ' या पुरस्काराने सन्मानित केले आहे. त्यासाठी गाडगीळ यांचे मन:पूर्वक अभिनंदन. मराठी जनांसाठी हा आनंद अधिक मोठा असेल. त्यामागील कारण गाडगीळ यांचे मराठी असणे हेच नाही. आंतरराष्ट्रीय ख्याती मिळवलेले तसे बरेच मराठी आपल्या आसपास सहज दिसतात. अशांच्या यशात 'लोकसत्ता' कधीही 'मराठी, मराठी' करत नाचत नाही. गाडगीळ यांचा अपवाद. याचे कारण आंतरराष्ट्रीय पातळीवर ख्यातकीर्त होऊनही गाडगीळ अत्यंत सुलभ, रसाळ, ओघवत्या मराठीत लिहितात. 'लोकसत्ता'चेही ते नियमित लेखक. त्यामुळे या अनोख्या गौरवात सहभागी होतानाच त्यांच्या मोठेपणाचे मर्म उलगडून सांगणे हे कर्तव्य ठरते.केवळ महाराष्ट्राचेच नव्हे तर देशाचेही आर्थिक धोरणाचे दिशादर्शक धनंजयराव गाडगीळ हे माधवरावांचे वडील. त्यांच्या हयातीतच त्यांना पर्यावरण प्रेमाची दीक्षा मिळाली. वडिलांच्या समवेत एका वीज प्रकल्पस्थळी भेट देत असता तेथे होणारी जंगलतोड पाहून धनंजयरावांनी आपल्या लेकाच्या मनात 'विकासाची किंमत' ही कल्पना पहिल्यांदा रुजवली. आपल्यासारख्या देशास वीज प्रकल्प तर हवाच, पण इतक्या अमानुष जंगलतोडीची किंमत आपण मोजावी काय, हा त्यांचा प्रश्न होता. भारताची पर्यावरण चर्चा आजतागायत याच प्रश्नाभोवती फिरताना दिसते. प्रकल्पाची नावे तेवढी बदलतात. कधी त्यात नाणार रिफायनरी येते, मग ती बारसूला जाते, जैतापूरचा महाकाय अणुवीज प्रकल्प येतो, नर्मदा सरोवर, उत्तराखंडातील चार धाम महामार्ग प्रकल्प, अस्थिर हिमालयाच्या अंगावर उभे राहणारे जलविद्युत प्रकल्प इत्यादी. यातील कोणत्याही प्रकल्पाच्या उभारणी विचारात पर्यावरण हा मुद्दा नसतो. असलाच तर तोंडदेखला. त्यात पुन्हा आपली विकासाची भूक दुहेरी. एक देश म्हणून विकास प्रकल्पांकडे आपण पाहणार आणि त्याचवेळी आपले अनेक राजकारणी या बड्या प्रकल्प उभारणीच्या निमित्ताने आपली घरे भरणार. हे परस्पर संबंध इतके गुंतागुंतीचे आहेत की या राजकारण्यांच्या हितसंबंधांस विरोध म्हणजे देशाच्या हितास आडकाठी असे म्हणण्यापर्यंत आपली मजल गेलेली आहे. या असल्या बतावण्यांवर विश्वास ठेवणाऱ्यांची संख्याही वाढती आहे हे अधिक विशेष. खरे तर आपल्याकडे जे सुरू आहे तो विकासवाद अजिबात नाही. तो आहे 'कंत्राटदारवाद'. म्हणजे त्यांच्या सोयीसाठी सरकारी कामे काढणे. अशा परिस्थितीत गाडगीळ यांच्यासारख्यांसमोर अधिकच अडचणी निर्माण होतात.पण त्यांचे मोठेपण हे की त्यांनी या असल्यांच्या विरोधास कधीही मोजले नाही. 'पश्चिम घाट बचाव मोहीम' हे त्याचे जिवंत आणि जाज्वल्य उदाहरण. हा पश्चिम घाट पर्यावरणदृष्ट्या नाजूक आहे आणि त्यातील जैवविविधताही अपार आहे. सबब येथे विकासाचा विचार जपून व्हायला हवा, इतकेच त्यांचे सांगणे. पण ते शास्त्रकाट्याच्या कसोटीवर तर्कशुद्धरीत्या नमूद करता यावे यासाठी गाडगीळ यांनी हा संपूर्ण परिसर पायाखाली घातला. एकदा नव्हे अनेकदा. यातील प्रत्येक पर्यावरणीय घटकाची नोंद केली. वास्तविक गाडगीळ यांस या अहवाल निर्मितीची जबाबदारी दिली होती केंद्रीय पर्यावरण खात्याने. अहवाल आला २०११ साली. पण कोणत्याही चांगल्या अहवालाची गत जशी होते तसेच या अहवालाचेही झाले. त्यानंतर केरळ ते अलिबाग या पट्ट्यात दरड खचण्याच्या एकापेक्षा एक गंभीर घटना घडल्या, शब्दश: हजारोंचे प्राण गेले आणि मग अनेकांना या अहवालाची आठवण झाली. रत्नागिरी जिल्ह्यातील आधी नाणार आणि नंतर बारसू येथे तेल शुद्धीकरण कारखाना काढण्यासंदर्भात जेव्हा वाद-विवाद सुरू झाले तेव्हाही या अहवालाचा संदर्भ आला. या संदर्भात युक्तिवाद करताना त्यांनी शासनाची लबाडी ज्या अभ्यासू पद्धतीने उघडकीस आणली तो अन्य पर्यावरणवाद्यांसाठी धडा आहे. राज्य शासनाने १९९५ साली उद्योग आणि त्यांस सुयोग्य स्थान निश्चित करता यावे यासाठी 'झोनिंग आराखडा' तयार केलेला आहे. गाडगीळ यांस हे माहीत असल्याने त्यांनी या विषयावर भूमिका घेण्याआधी सरकारकडे हा आराखडा मागितला. सरकारने टाळाटाळ केली. असा काही आराखडाच नाही येथपासून तो गहाळ झाला असे विविध बचाव सरकारने केले. अखेर गाडगीळ यांनी प्रयत्नांची पराकाष्ठा करून हा आराखडा मिळवला आणि मग त्याआधारे आपली भूमिका मांडली. ती अर्थातच सरकारला अडचणीची होती. आणि अजूनही आहे. गाडगीळ इतकेच करून थांबले नाहीत. तर त्यांनी सर्व अभ्यासकांसाठी हा आणि असे महत्त्वपूर्ण तपशील इंटरनेटच्या माध्यमातून सहज उपलब्ध होतील, याची व्यवस्था केली. हा पश्चिम घाट असो वा विदर्भातील जंगल, गाडगीळ यांचा या सगळ्याबाबतचा दृष्टिकोन विधायक आणि तरीही पर्यावरण रक्षण हा राहिलेला आहे. विदर्भाच्या जंगलात स्थानिक आदिवासींना हाताशी धरून त्यांनी केलेला झाडे-झुडपे-ऑर्किड आदींच्या नोंदीचा प्रयोग तर एव्हाना सर्वांनाच ठाऊक आहे. या संदर्भात या स्थानिक अशिक्षितांची नोंद आंतरराष्ट्रीय पातळीवरील शोधनिबंधकर्ते म्हणून झाली. हे श्रेय गाडगीळांचे. हल्ली हातोहाती असलेले स्मार्ट फोन पर्यावरणातील तपशील नोंदी करण्यासाठी कसे वापरता येतात हे यातून दिसले. पण त्याहीपेक्षा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे एरवी काळाच्या पडद्याआड गेला असता अशा ऐवजांच्या नोंदी झाल्या.अशा या सक्रिय, सहृदयी आणि सच्छिल पर्यावरणप्रेमिकास 'युनो'ने गौरवले ही आपल्या सगळ्यांसाठी आनंदाची बाब. कोणत्या तरी टिनपाट द्वैवार्षिक स्पर्धेतील विजेतेपद मिळाले म्हणून कंबरेचे सोडून धावणाऱ्या आपल्या सत्ताधीशांस या गौरवाचे मोल असेल असे मानणे हा वेडा आशावाद येथे व्यक्त करण्याची गरज नाही. पण तरीही महाराष्ट्र विधानसभेने माधवरावांस खास निमंत्रण देऊन सन्मानावे, त्यांचे चार शहाणे बोल ऐकावेत, जमल्यास ते आचरणात आणावेत ही अपेक्षा करणेही चुकीचे नाही.

अविरत संघर्ष, अद्वितीय लोकनेता !

कुठलाही राजकीय वारसा नसताना आणि अतिशय छोट्या खेड्यातून स्वतः च राजकीय अस्तित्व निर्माण करणाऱ्या माजी केंद्रीय मंत्री गोपीनाथ मुंडे यांची आज जयंती. भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते लालकृष्ण अडवाणी यांनी सुध्दा गोपीनाथ मुंडे यांना लोकनायक म्हणून संबोधले होते. आज त्यांची ओळख लोकनायक लोकनेता म्हणून आहे ती त्यांनी केलेल्या संघर्षामुळे आणि तो संघर्ष होता शेतकऱ्यांचा, कष्टकऱ्यांचा, ऊसतोड कामगारांचा.याच संघर्षातून गोपीनाथ मुंडे यांचा राजकीय प्रवास घडत गेला. आघाडीच्या सरकारविरोधात रान उठवण्याची धमक असलेला महाराष्ट्रातील विरोधी पक्षातील एकमेव नेता म्हटले तरी वावगे ठरणार नाही. महाविद्यालयीन जीवनात प्रमोद महाजन यांची मैत्री आणि तीथपासून सुरू झालेला राजकीय प्रारंभ.मुंडेंनी बीडच्या कॉलेजमध्ये विद्यार्थी संसदेच्या निवडणुका लढवून राजकारणाचा प्रवेश केला. कॉलेजात असतांना त्यांची प्रमोद महाजन यांच्याशी मैत्री झाली. याने त्यांच्या आयुष्यालाच कलाटणी मिळाली. महाविद्यालयीन जीवनापासून नेतृत्व करण्याची संधी मिळाली आणि पुढे लोकसभेत नेतृत्व असा प्रवास साधा नव्हता. कारण, भारतीय जनता पक्षाला मराठवाड्यात किंबहुना महाराष्ट्रात म्हणावा तितकासा वाव नव्हता आणि अशा खडतर प्रवासात पक्षाचा कार्यकर्ता घरोघरी निर्माण केला तो गोपीनाथ पांडुरंग मुंडे यांनी. गोपीनाथ मुंडे यांनी भाजपला जनाधार मिळवून देण्यासाठी भाजपच्या राष्ट्रीय नेत्यांना आणून अविकसित भाग कसा आहे याची ओळख करून द्यायची.इ. स. १९९२ ते इ.स. १९९५ या कालावधीत मुंडेंनी विधानसभेतील प्रमुख विरोधी पक्षनेतेपद सांभाळले. विधानसभेतील विरोधी पक्षनेतेपद मिळवल्यानंतर मुंडे यांचा वारू महाराष्ट्रभर उधळला. विरोधी पक्षनेते असताना राजकारणाच्या गुन्हेगारीकरण विरोधात त्यांनी आवाज उठविला. अनेक प्रश्न अभ्यासपूर्ण पद्धतीने मांडून, विरोधी पक्षनेत्यांची स्वतंत्र प्रतिभा निर्माण केली.त्यावेळी मुद्याचं राजकारण करण्यावर भर दिला. आरक्षण, मण्डल आयोग, शेतकऱ्यांचे प्रश्न आदी प्रश्न गांभीर्याने पाहिले.त्यांना ऊसतोड कामगारांचे प्रश्न, शेतकऱ्यांचे, कष्टकऱ्यांचे,वीज, पाणी आणि बाबतच्या प्रश्नांची उत्तम जाण होती. शेतकऱ्यांचा मालाला भाव मिळत नाही म्हणून त्यांनी अनेकदा तत्कालीन सरकारविरोधात आसूड ओढले. भारतीय जनता पक्षाची सत्ता राज्यात १९९५ आली.खरं तर सत्तेच्या बाहेर अधिक काळ गोपीनाथ मुंडे यांनी संघर्ष केला.इ.स. १९८० पासून इ.स. २००९ पर्यंत महाराष्ट्राच्या विधानसभेत परळी विधानसभा मतदारसंघाचे प्रतिनिधित्व केले तसेच इ.स.२००९ पासून इ.स.२०१४ पर्यंत भारताच्या लोकसभेत बीड लोकसभा मतदारसंघाचे प्रतिनिधित्व केले होते. तसेच भारतीय जनता पक्षाचे (भाजप) लोकसभेतील उपनेते होते (इ.स. २०१२). १४ मार्च इ.स. १९९५ ते इ.स. १९९९ या काळात ते महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री तसेच गृहमंत्री होते.लोकसभेतील त्यांची भाषणं नेमकी आणि अभ्यासू व सर्वसामान्यांच्या प्रश्नांविषयी असायची तर ते महापुरुषांच्या विचारांची पेरणी त्यांच्या संसदेतील भाषणात असायची.

एखादा सामान्य माणूस केंद्रीय मंत्री पदापर्यंत

पदमाकर उखळीकर,
मो.९९७५१८८९१२

पोहोचतो हे सामान्य बाब नाही.भारतीय जनता पक्षात ओबीसींचा नेता म्हणून अल्पावधीतच त्यांना ओळख मिळाली. महाराष्ट्रात ओबीसींच्या मनामनांत भाजपाविषयी कमळाची प्रतिमा निर्माण करणारे गोपीनाथ मुंडे.कोणतही जातीपातीच राजकारण न करता त्यांनी सतत शेतकऱ्यांची बाजू घेऊन राजकारण केलं.महाराष्ट्र ही संतांची आणि महापुरुषांची भूमी या भुमीने सर्वधर्म समभाव देशाला शिकविला त्या भुमीतील महापुरुषांच्या विचारांवर चालणारं व्यक्तीमत्व म्हणजे गोपीनाथ मुंडे.सतत संघर्ष कधी जनतेसाठी तर कधी पक्षाच्या ध्येय धोरणांसाठी अविरतपणे संघर्ष करावा लागलेल्या गोपीनाथ मुंडे यांना जनतेने दिल्लीपर्यंत पाठवले पण, नियतीचा खेळ म्हणावा लागेल की,भाजपची आजपर्यंत कधी निर्विवाद सत्ता आली नाही ती २०१४ साली आली. गोपीनाथ मुंडे यांनी केंद्रीय ग्रामविकास मंत्री म्हणून शपथ घेतली आणि काही दिवसांनी त्याच्या अपघाताची माहिती मिळाली.काळाने घात केला बीड जिल्ह्यातील संघर्ष थांबला.ही घटना काळाकडून हिरावून घ्यावी असे वंजारी समाजाला वाटले. खरं तर कधी जातीचा कुठे लवलेशही नसलेला बहुजन नेता महाराष्ट्राने गमावला होता.तर भाजपचा ओबीसींचा नेता हरपला होता.आज त्यांची कन्या राज्याच्या माजी मंत्री आ.पंकजा मुंडे ह्या वारसा चालवत आहेत.तोही संघर्षाचा.वडिलांची हयात तर संघर्षात गेली पण मुलगी सुध्दा संघर्षातून उभी राहिली आहे. राजकीय वारसा सर्व काही तारून नेऊ शकत नाही. पंकजा मुंडे यांचा २०१९ साली परळी विधानसभा मतदारसंघातून पराभव झाला. मात्र, पंकजा मुंडे यांना मानणारा वर्ग कुठेही फिरकला नाही.हे गोपीनाथ मुंडे यांच्या संघर्षाचं फलित पंकजा मुंडे सांभाळत आहेत.अन्यथा राजकीय वारसा एकदा निवडणुकीच्या रिंगणातून बाहेर फेकला गेला की, त्याकडे कुणी फिरकतही नाही.पण,याला अपवाद ठरतात तो गोपीनाथ मुंडे यांचा वारसा.ही कोणाला घराणेशाही सुध्दा वाटेल पण,हे संघर्षाचं फलित आहे.हे अनेकदा गोपीनाथ मुंडे यांच्या १२ डिसेंबर या जयंतीदिनी, स्मृती दिनी,दसरा मेळाव्याततून दिसतं.कुणाला सांगावं लागतं नाही. आपसूकच अभिवादन करण्यासाठी मुंडे समर्थकांची गर्दी होते.हेच वलय गोपीनाथ मुंडे हयात असताना त्यांनी निर्माण केल आज तेच वलय टिकून आहे आणि राहणार एवढं मात्र नक्की!

पान एक वरून

७५ लाख मते कशी...तीनही आरओ यांचे उत्तर समान आहे. त्यामुळे प्रश्न असा होतो की, ७५ लाख मते खरेच झाली होती का ? कायदा असे म्हणतो की, एकदा सायंकाळी ५ वाजून ५९ मिनिटे झाले की, निवडणूक प्रक्रिया थांबवावी लागते, दरवाजे बंद करावे लागतात, जे आत मध्ये आहेत त्यांना टोकन दिले जाते आणि जेवढ्या मतदारांना टोकन असते त्यालाच मतदान करण्याचा अधिकार असतो असे ॲड. आंबेडकर यांनी म्हटले आहे.

वाल्मिक कराड यांच्यावरील....आंदोलन करण्याचा इशाराही महायुतीच्या वतीने देण्यात आला आहे. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष वैजनाथराव सोळंके, रिपाइंचे नेते सचिन कागदे, शहराध्यक्ष बाजीराव भैय्या धर्माधिकारी, भाजप युवा मोर्चाचे निळकंठ चाटे, शिवसेना तालुका प्रमुख व्यंकटेश शिंदे त्याचबरोबर सूर्यभान नाना मुंडे, प्रा.पवन मुंडे, दीपक नाना देशमुख, सुनील नाना फड, सुरेश अण्णा टाक, जयपाल लाहोटी, शरद भाऊ मुंडे, शकील भाई कुरेशी, अजीज भाई, सिराज भाई, रवींद्र परदेशी, सोफियाताई नंबरदार, युवतीच्या तालुकाध्यक्ष प्रा.शिल्पाताई मुंडे, वैशाली ताई तिडके, सुलभा साळवे, अर्चनाताई रोडे यांसह आदी उपस्थित होते.

आंबेडकरी वस्त्यातील...यावेळी मायाताई मिसळे, बापू पवार, सुभाष तांगडे, भाऊसाहेब कांबळे, प्रभाकर चांदणे,नवनाथ डोळस, भैय्यासाहेब मस्के, भीमराव घोडेराव,राहुल कांबळे,रामेश्वर खळगे,देवानंद वाघमारे,मंगेश पवार, राजेभाऊ वक्ते, महेंद्र वडमारे, भैय्यासाहेब वाघमारे, सुरेखा डोंगरदिवे, विशाल इंगोले, धम्मा पारवेकर, आनंद मोरे, विशाल वक्ते, देवानंद वाघमारे, समाधान गवळी, अनिता तुरुकमारे, संभाजी गायकवाड,प्रविण निसर्गंध, मनोज बोराडे, मंगेश पवार, विकाश ओव्हाळ, रमेश जावळे, अविनाश गायकवाड, राहुल गायकवाड, सुवर्णा मिसळे, शोभा गलांडे, रमेश जावळे, यांच्यासह रिपाइंचे पदाधिकारी, कार्यकर्ते यावेळी मोठया संख्येने उपस्थित होते.

राज्यसभेत खरगे अन् धनखडमध्ये...खचून जाणार नाही. मी देशासाठी माझ्या प्राणांची आहुती देईन. तुम्हाला (विरोधकांना) २४ तास एकच काम आहे, शेतकऱ्याचा मुलगा इथे का बसला आहे? मी खूप सहन केले तुम्हाला प्रस्ताव आणण्याचा अधिकार आहे, पण तुम्ही संविधानाचा अपमान करत आहात. धनकड यांचा जन्म १९५१ मध्ये राजस्थानच्या झुणझुणू येथील कैथरना गावात झाला आहे. विरोधकांनी अविश्वास ठराव आणल्यानंतर भाजपाकडून हा जाट समुदायाचा आणि गरीब कुटुंबातून पुढे आलेल्या एका शेतकरी पुत्राचा अपमान करण्यात आल्याचा दावा केला जात आहे.दरम्यान धनखड यांच्या या आरोपांना मल्लीकार्जुन खरगे यांनी जोरदार प्रत्युत्तर दिले. त्यांनी राज्यसभा सभापती काँग्रेस नेत्यांचा अपमान करत आहेत आणि ते भाजपाच्या खासदारांना विरोधकांना लक्ष करण्याची संधी देत असल्याचा आरोप धनकड यांच्यावर केला. तुम्ही सदस्यांना (भाजप) इतर पक्षांच्या सदस्यांविरूद्ध बोलण्यासाठी प्रोत्साहित करत आहात मी देखील एका मजूराचा मुलगा आहे. मी तुमच्यापेक्षा कठीण काळ पाहीला आहे तुम्ही आमच्या पक्षाच्या नेत्यांचा अपमान करत आहात, तुम्ही काँग्रेसचा अपमान करत आहत आम्ही येथे तुमचे गुणगान ऐकण्यासाठी आलेलो नाहीत, आम्ही येथे चर्चेसाठी आलो आहोत, असे खरगे म्हणाले.दरम्यान धनखड यांचे पक्षपाती वर्तन घटनाविरोधी आहे असा आरोप विरोधकांकडून केला जात आहे. राज्यसभेतील विरोधी पक्षांच्या ६० हून अधिक सदस्यांनी धनखड यांच्याविरोधातील अविश्वास प्रस्तावाच्या नोटिशीवर स्वाक्षरी केली आहे. यामध्ये काँग्रेससह तृणमूल काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस-शरद पवार गट, द्रमुक, डावे पक्ष, समाजवादी पक्ष, राष्ट्रीय जनता दल, झारखंड मुक्ती मोर्चा आदी 'इंडिया' आघाडीच्या खासदारांचा समावेश आहे.

...म्हणून ग्रामसभा करावी ...खोळंबली आहेत. या प्रकरणी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी लक्ष घालून कार्यवाही करावी अशीही मागणी या तक्रारी निवेदनात सरपंच अन्वर पट्टेदार यांनी केली आहे .पुढील सर्वस्वी जबाबदारी प्रशासनाची राहिल असेही निवेदनात म्हटले आहे .

देणंघेणं नसलेला निर्दयी... महाविद्यालयाचे डीन यांच्याकडून स्वागत सत्कार स्वीकारत आहेत. हे त्यांना शोभते का?आज बीड जिल्हा बंद होता बीड जिल्ह्यातील सकल मराठा समाज दुखाट्यात असताना आमदार व आमदार सासरे हार तुरे शिव करतात व आंबेडकरी जनता हेही संविधानाचा अवमान केल्याप्रकरणी आंदोलन करीत आहेत अशावेळी काहीतरी निमित्त काढून अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयाच्या डीन कडून सत्कार स्वीकारून आमदार नमिता मुंदडा धन्यता मानत आहे हे कितपत योग्य आहे असा प्रश्न नागरिकांना पडला आहे चर्चा सत्र सुरू झाले आहे.

शिक्षक खून प्रकरणात १२

आरोपींनी त्यांच्यावर हल्ला करुन कुऱ्हाड, कोयत्याने त्यांचे पाय तोडले होते. या प्रकरणात गुज्जर खानसह साथीदारांवर गुन्हा नोंद होता. २०१९ मध्ये या गुन्ह्याची सुनावणी सुरु झाली होती. दरम्यान, प्राणघातक हल्ला केल्याची केस न्यायालयातून मिटवून घेत का नाही,या कारणावरुन १९ सप्टेंबर २०१९ रोजी दुपारी २.३० ते ३ वाजण्याच्या सुमारास शिक्षक साजेद अली यांचा आरोपींनी भररस्त्यात वार करुन खून केला होता. या प्रकरणात एकूण १८ आरोपींविरुध्द शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद झाला होता. पोलिसांनी १७ आरोपींना अटक केली होती तर एक आरोपी गुन्हा घडल्यापासून फरार आहे. यातील ६ जण जामिनावर होते तर, ११ जण कारागृहात होते. या प्रकरणात सुनावणीअंती न्यायालयाने १४ जणांना दोषी ठरवले होते. तर, ३ जणांना निर्दोष सोडले. त्यानंतर शुक्रवारी सकाळी ११ वाजता बीड मकोका विशेष न्यायालयात या प्रकरणाचा निकाल दिला. यावेळी न्यायालय परिसरात कडेकोट पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.या प्रकरणात आरोपीस फरार होण्यास मदत केल्याप्रकरणी आरोपी बबरखान गुलमंहमदखान पठाण (रा. नेकनूर,ता.बीड) याला न्यायालयाने पाच वर्षांचा कारावास व ५ लाखांचा दंड ठोठावला तर, शेख वसीम शेख बुऱ्हानोद्दीन (रा.बालेपीर,बीड) याला खंडणी मागितल्याप्रकरणी दोषी ठरवून सहा महिन्यांची शिक्षा व ५०० रुपये दंड ठोठावला.

संतोष देशमुख हत्या प्रकरणी

नागरिक आणि विविध संघटनांचा चांगला प्रतिसाद मिळाला. सोमवारी (दि. ९) भरदुपारी स्व. संतोष देशमुख यांचे अपहरण करण्यात आले होते. त्यानंतर तीन तासांनंतर त्यांचा मृतदेह सापडला. ही हत्या अतिशय क्रूरपणे केल्याचे उघड झाले आहे. या घटनेनंतर पोलिस प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. मारेकऱ्यांना पाठीशी घालण्याचा प्रयत्न पोलीस प्रशासनाकडून होत असल्याचा आरोप करण्यात येत आहे, ज्यामुळे नागरिकांमध्ये रोष निर्माण झाला आहे.या घटनेच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील व्यापाऱ्यांनी आपली दुकाने बंद ठेवत निषेध नोंदवला. नागरिक आणि संघटनांनीही मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदवत संतोष देशमुख यांच्या कुटुंबाला न्याय मिळावा आणि जिल्ह्यातील वाढत्या गुन्हेगारी प्रवृत्तींना आवर घालावा, अशी मागणी केली. जिल्ह्यात दिवसेंदिवस वाढणाऱ्या गुन्हेगारीमुळे वातावरण दहशतीचे झाले आहे. या घटनेनंतर बीड जिल्ह्यात बिहारसारखी परिस्थिती निर्माण होत असल्याचा आरोप होत आहे. नागरिकांनी प्रशासनाने कठोर भूमिका घेऊन दोषींवर तत्काळ कारवाई करण्याची मागणी केली आहे.या बंदमुळे बीड जिल्ह्यातील सामान्य जनजीवन ठप्प झाले होते. संतोष देशमुख यांची हत्या आणि त्यामागील सूत्रधारांना अटक होईपर्यंत अशा निषेधाच्या लाटा जिल्ह्यात सुरूच राहतील, असे नागरिकांनी स्पष्ट केले आहे.

परळीत धावतात मोडकळीस आलेल्या बसेस

सवाल:भंगार बसमधून किती दिवस प्रवास करायचा?

परळी/पुण्यभूमी प्रतिनिधी

प्रवाशांच्या सेवेसाठी' हे ब्रीदवाक्य असले तरी सध्याच्या अनेक बसेस प्रवाशांना सेवा देण्यास कमी पडत असल्याचे चित्र आहे. परळी वैजनाथ आगार अंतर्गत परळी ते धर्मापुरी रोडवर धावतात मोडकळीस आलेल्या बसेस त्यामुळे प्रवाशाचा हाल होत आहेत. भंगार बसमधून आम्ही किती दिवस प्रवास करायचा साहेब? असा सवाल प्रवाशी करत आहेत.

राज्यातील महामंडळाच्या ताफ्यात अनेक बस आहेत. पण, यातील काही बस या जुन्या झाल्याने तसेच मोडकळीस आल्याने बंद आहेत. अनेक ठिकाणी नव्या बसची गरज आहे. बहुतांश ग्रामीण भागात जुन्या मोडकळीस आलेल्या बस प्रवास करत आहेत. यातील अनेक बस या जुन्या असल्याने भंगार पडून आहे. त्यामुळे महामंडळाने आता विजेवर चालणाऱ्या बस सुरू केल्या आहेत. ग्रामीण भागात बसची आवश्यकता आहे. परळी ते धर्मापुरी रोडवर अजूनही जुन्या मोडकळीस आलेल्या बस जात असल्याने प्रवाशाचे हाल होतात. गेली अनेक वर्षांपासून खूप जुन्या झाल्याने चालवताना चालकांचे हाल होतात. यामध्ये बस बंद पडणे, बसण्यासाठी सीट व्यवस्थित नाही, खिडकी आशा अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. या बसमधून काळा धूर निघतो. बस बंद पडल्याच्या तक्रारी ऐकायला येतात. यामुळे कामावर जाणाऱ्या तसेच कॉलेजमध्ये जाणाऱ्या विद्यार्थ्यांचे हाल होतात. त्यामुळे या मार्गांवर दुरुस्त किंवा नवीन बस देण्यात याव्यात अशी मागणी होत आहे.

पान सहा वरून

केज पीआयचे निलंबन

मात्र अद्यापही महाजन यांच्यावर कसलीही कारवाई झालेली नाही. त्यांना साधे कंट्रोलला देखील ॲटॅच केलेले नाही, ते अजुनही तिथेच आहेत. या प्रकरणात विनाकारण लांबवालांववी करुन महाजन यांना वाचविण्याचा प्रयत्न केला जात आहे का? असा प्रश्न देखील उपस्थित होऊ लागला आहे.

सुर्यपूत्र यशवंत आंबेडकरांना

डी पी पोटभरे यांनीमानले तर सुत्रसंचलन भारतीय बौद्ध महासभेचे संरक्षण सचिव दयानंद साळवे यांनी केले हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी नितीन डोंगरे,मोहन काकडे,भानुदास साळवे,राजेभाऊ साळवे, भगवान डोंगरे,डी पी वाघमारे नाना,संभाजी धाईजे, बाबासाहेब घनघाव,मंदाताई साळवे,विशाखाताई वाघमारे,पोहरेताई, वैशालीताई गायकवाड,घनघावताई यांच्या सह भारतीय बौद्ध महासभेचे पदाधिकारी यांनी परिश्रम घेतले

पेट परीक्षेत सुभाष

यश मिळविले आहे. त्यांना पत्रकारितेत पीएच. डी करण्याची संधी मिळणार असून, श्री. सुतार हे गेल्या वीस वर्षांपासून पत्रकारितेत काम करत आहेत. या आधी झालेल्या पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर सोलापूर विद्यापीठ, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ पेट परीक्षेत ते पात्र झालेले आहे. त्यांच्या यशाबद्दल त्यांचे कौतुक केले जात असून , सर्व स्तरातून पत्रकार सुतार यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव केला जात आहे.

ट्रेनी शिक्षक म्हणाले कार्यकाल

न्यायाची भुमिका घेत किमान एक वर्ष कार्यकाळ वाढवून देण्यात यावा व जलद गतीने कार्यवाही करण्यात यावी हि मागणी या वेळी उपस्थित युवा प्रशिक्षणार्थी (ट्रेनिंग शिक्षक) यांच्यावतीने करण्यात आली. यावेळी झालेल्या छोट्या खाणी झालेल्या बैठकीत गटशिक्षणाधिकारी रवींद्र महामुनी व श्री. पोटभरे यांनी उपस्थितांना मोलाचे मार्गदर्शन केले. व आपल्या मागण्या शासन दरबारी मांडून आपल्याला न्याय मिळवून देण्यासाठी आम्ही पण प्रयत्नशील आहोत याची ग्वाही दिली. यावेळी दळवी गोविंद , घडसिंगे अनंत , हिवाळे मुकुंद , राठोड विशाल ,पवार शरद, थोरात भिम , टाकणखार सुमित,पट्टेकर अनिकेत, भालेकर आकाश, खुने प्रशांत, सय्यद नईम, जाधव निलेश यांच्यासह महिलांची उपस्थिती ही लक्षणीय होती. यावेळी कांबळे शिल्पा ,उघडे सिमा, सावंत पुजा, वाघमारे अर्चना,शिंदे पुजा, जाधव कोमल, ऊखंडे अमृता, टाकणखार किर्ती, शिंदे विद्या, होके अन्विता, यांच्यासह अनेक युवा प्रशिक्षणार्थी (ट्रेनी शिक्षक) उपस्थित होते. यावेळी उपस्थितांना भीमराव आप्पा टाकणखर, दत्ताभाऊ कांबळे, पत्रकार मच्छिंद्र भाऊ उफाडे यांचे विशेष मार्गदर्शन व सहकार्य लाभले.

गोपीनाथगड येथे केले

भल्यासाठी एक अमूल्य दान आहे. यामुळे जीवन वाचवले जाते आणि समाजात एकजूट निर्माण होते.स्व. गोपीनाथराव मुंडे यांनी समाजसेवा आणि रक्तदानाला नेहमी महत्त्व दिले, आणि श्री नावंदे यांनी त्याच विचारांच्या प्रेरणेतून हे कार्य केले. रक्तदान हा जीवन वाचवण्याचा एक अत्यंत महत्त्वपूर्ण मार्ग आहे, असा संदेश त्यांनी दिला. यावेळी प्रेस फोटोग्राफर श्री गणेश पत्रावळे उपस्थित होते.श्री नावंदे यांनी समाजकार्याच्या पुढील पावलांबद्दल आपले आश्वासन दिले आणि समाजसेवा, एकता व रक्तदानाच्या महत्वाचा संदेश दिला.

गोळीबार प्रकरणात आमदाराचा

हल्ला घडवून आणला, त्यावेळी आत्मसंरक्षणासाठी परवानाधारक शस्त्रातून सतीश पवारांना हवेत गोळीबार करावा लागला, हा इतका मोठा वाद आमदारांनी निर्माण केला. अशा खोट्या केसेस करण्यासाठी काही दलित बांधवांना हाताशी धरून त्यांचा वापर केला जातो. त्यामुळे समाजात तेढ निर्माण होते. हा आमदाराचा इतिहास पाहता बीडच्या गोळीबार प्रकरणात देखील त्यांचा हात असू शकतो, आरोपी हा त्यांच्याशी संबंधित व्यक्ती आहे. त्यामुळे कायदा सुव्यवस्थेचे धडे शिकविणाऱ्या बीडच्या आमदाराची देखील कसून चौकशी व्हायला हवी, अशी मागणी डॉ. योगेश क्षीरसागर यांनी पोलीस प्रशासनाकडे केली आहे.

संपादक : **बाळासाहेब भगवान मस्के**, कार्यकारी संपादक : **सुनिल मसू डोंगरे**
हे दैनिक प्रकाशक,मुद्रक,मालक,संपादक बाळासाहेब भगवान मस्के यांनी बी.एम.प्रिंटर्स ॲन्ड पब्लिकेशन, बीड, ता.जि.बीड येथे छापून दैनिक बीड पुण्यभूमी तहसीलच्यामागे, डीपी रोड बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
(अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत दुरध्वनी-०२४४२-२९९०८४,ई-मेल-beedpunyabhumi@gmail.com

Daily Beed punyabhumi hews paper owner, publisher, Edit Balasaheb Bhagwan Maske has printed at B.M. printexs, behing the tehsil, dp road (Maharashtra) 431122
Published at daily Beed Punyabhumi office, behing the tehsil, dp road, beed -431122 Phone No.

हॅप्पी बर्थडे

प्रतिभा शरद पवार (समाजकारण)

रामभाऊ जोशी (ज्येष्ठ पत्रकार)

दगुबती व्यंकटेश (चित्रपट अभिनेता)

धनश्री हळबे (लेखिका)

संजय देशपांडे (लोकमत पत्रकार)

अतुल शहा (माजी आमदार)

राजेंद्र थोरात (वरिष्ठ पत्रकार)

अशोक कुमार प्रधान (माजी खासदार)

मेहबूब शेख (राष्ट्रवादी प्रदेश युवक अध्यक्ष)

कर्नाक पुलाच्या लोखंडी तुळईचे ८३ टक्के सुटे भाग प्रकल्पस्थळी दाखल

कार्यवाही १९ जानेवारी रोजी पूर्ण करण्याकामी पालिका प्रयत्नशील

◆ मुंबई (प्रतिनिधी) :

मशीद बंदर रेल्वे स्थानकापासून काही अंतरावर असलेला व पी. डि'मेलो मार्गाला जोडणाऱ्या १५४ वर्ष जुन्या कर्नाक पुलाची पालिकेकडून पुनर्बांधणी सुरू आहे. या प्रकल्प अंतर्गत ५१६ मेट्रिक टन वजनाची दक्षिण बाजुची लोखंडी तुळई (गर्डर) रेल्वे भागावर स्थापित करण्याची कार्यवाही पूर्ण झाली आहे. आता, दुसऱ्या बाजुच्या लोखंडी तुळई (गर्डर) चे ४२८ मेट्रिक टन (८३ टक्के) सुटे भाग प्रकल्पस्थळावर दाखल झाले आहेत.

तर, उर्वरित सुटे भाग २० डिसेंबरपर्यंत प्रकल्पस्थळी दाखल होणे अपेक्षित आहे. तुळईच्या सुटे भागांचे जोडकाम, तुळई स्थापित करण्याची कार्यवाही, पोहोचमार्ग (ॲप्रोच रोड) बांधणी, भार चाचणी (लोड टेस्ट) आदी कामकाजाचे सूक्ष्म नियोजन करत वेळापत्रक निश्चित करण्यात आले आहे. त्यानुसार, अपेक्षित कार्यवाही पूर्ण झाल्यास ५ जूनपर्यंत कर्नाक पूल वाहतुकीस खुला करण्यासाठी पालिका प्रयत्नशील आहे.

दक्षिण मुंबईतील मशीद बंदर, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस आणि मोहम्मद अली मार्ग परिसरातील वाहतुकीसाठी कर्नाक पूल महत्त्वाचा आहे. लोकमान्य टिळक मार्गावरील कर्नाक पूल धोकादायक झाल्यामुळे पालिकेने या पुलाच्या पुनर्बांधणीचे काम हाती घेतले आहे. पालिकेच्या पूल विभागामार्फत पुलाच्या पुनर्बांधणीचे कामकाज वेगाने सुरू आहे. कर्नाक पुलाच्या दुसऱ्या बाजूच्या लोखंडी तुळई (गर्डर) चे ४२८ मेट्रिक टन (८३ टक्के) सुटे भाग प्रकल्पस्थळावर दाखल झाले आहेत. तर, उर्वरित सुटे भाग २० डिसेंबरपर्यंत प्रकल्पस्थळी दाखल होणे अपेक्षित आहे. १३ जानेवारीपर्यंत तुळईच्या सुटे भागांचे जोडकाम करून १४ जानेवारी रोजी 'ट्रायल रन' केले जाईल. १८ आणि १९ जानेवारी रोजी रेल्वे 'ब्लॉक' मिळण्याबाबत मध्यरेल्वे प्रशासनाकडे विनंती करण्यात आली आहे.

उपरोक्त कालावधीत रेल्वे 'ब्लॉक' मिळाल्यानंतर १९ जानेवारीपर्यंत तुळई स्थापित करण्याची कार्यवाही पूर्ण केली जाईल. त्या दृष्टीने पालिका प्रशासनाकडून मध्य रेल्वेसोबत समन्वय साधण्यात येत आहे. पुलाचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर जसे की, ॲण्टी क्रॅश बॅरिअर्स, वीजेचे खांब उभारण्याकामी होणारा कालापव्यय टाळण्यासाठी ही कामे समांतरपणे पूर्ण केली जाणार असल्याचे अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (प्रकल्प) अभिजीत बांगर यांनी नमूद केले.

१८, १९ जानेवारी रोजी मध्य रेल्वेवर 'ब्लॉक'ची शक्यता

पूर्व आणि पश्चिम दिशेच्या पोहोचमार्गासाठी खांब बांधणीचा पहिला टप्पा १५ मार्चपर्यंत पूर्ण करणे, दिनांक १७ एप्रिलपर्यंत खांब उभारणी पूर्ण करणे, ३ मेपर्यंत पोहोच रस्त्यांचे काँक्रिटीकरण आणि १ जून रोजी भार चाचणी करण्याचे नियोजन आहे. या नियोजित वेळापत्रकानुसार, अपेक्षित कार्यवाही पूर्ण झाल्यास ५ जूनपर्यंत कर्नाकपूल वाहतुकीस खुला करण्यासाठी पालिका प्रयत्नशील आहे. मात्र, त्यासाठी १८ आणि १९ जानेवारी रोजी मध्य रेल्वे प्रशासनाने 'ब्लॉक' मंजूर करणे अत्यंत आवश्यक आहे. त्यादृष्टीने मध्य रेल्वे प्रशासनाकडे पाठपुरावा केला जात आहे.

कामगार महर्षी : गं. द. आंबेकर

कामगार चळवळीचे जनक व राष्ट्रीय मिल मजदूर संघाचे संस्थापक गंगाधर दत्तात्रय आंबेकर यांची आज १३ डिसेंबर रोजी ६० वी पुण्यतिथी आहे. त्यानिमित्त त्यांच्या आठवणींना दिलेला उजाळा.

अमेय गुप्ते

आपल्या पुरोगामी महाराष्ट्रात अनेक वर्षापासून कामगार चळवळी सन १९०० ते १९२० या काळात अस्तित्वात आल्या. नंतर भारतात कापडगिरण्या, रेल्वे कंपन्या असे अनेक उद्योग सुरू झाले. या औद्योगिकीकरणामुळे देशात कामगारांचा मोठा वर्ग निर्माण झाला.सन १९२० मध्ये" ऑल इंडिया ट्रेड युनियन काँग्रेस " स्थापन होऊन कामगार चळवळी जोर धरू लागल्या. स्वातंत्र्योत्तर काळातही कामगारांचे प्रश्न सोडवण्यासाठी अनेक युनियन्सची स्थापना झाली. महाराष्ट्रात सन १९६० ते १९८० पर्यंत कामगार चळवळींचा प्रभाव होता. सत्यशोधक चळवळीचे जनक नारायण मेघाजी लोखंडे यांनी महाराष्ट्र आणि भारतात संघटित कामगार चळवळीची स्थापना केली. या चळवळीत स.का.पाटील, बाळासाहेब सावंत, अबिदाल्ली, बॅरिस्टर रजनी पटेल, वसंतराव होशिंग, भाई भोसले, हरिभाऊ नाईक, मनोहर फाळके, गोविंदराव आदिक, शंकरराव जाधव, रामचंद्र हुलावळे यांच्यासह जी. डी. आंबेकर यांचे नाव सुवर्णाक्षरांनी लिहावे लागेल. गंगाधर दत्तात्रय आंबेकर यांचा जन्म दि. २१ ऑगस्ट १९०७ रोजी जुन्नर येथे त्यांच्या आजोळी झाला. जुन्नरचे मॅजीस्ट्रेट हर्डीकर हे त्यांचे आजोबा. आंबेकर यांचे वडील दत्तात्रय कृष्णाजी आंबेकर हे रसायन शास्त्राचे प्राध्यापक असून पंजाब मधील लायलपूर येथील शेतकी महाविद्यालयात प्राध्यापक होते. तर त्यांच्या मातोश्री लक्ष्मीबाई दत्तात्रय आंबेकर या सुसंस्कृत व गृहकृत्यदक्ष होत्या. उच्च शिक्षण घेतल्यानंतर आंबेकर गोवर्धन मपारा, शं.गो.आठवले, कृष्णा खाडिलकर या तीन सहकाऱ्यांसह हिंदुस्थान मजदूर सेवक संघाने चालविलेल्या अहमदाबाद येथील कामगार कार्यकर्ते प्रशिक्षण वर्गात दाखल झाले.



त्या काळचे थोर समाजसुधारक व गांधीवादी नेते शंकरराव देव आणि आचार्य भागवत यांची प्रेरणा त्यांना महत्त्वाची ठरली. प्रशिक्षण घेतल्यानंतर सरदार वल्लभभाई पटेल यांनी आंबेकर यांना त्यांच्या तीन मित्रांसह सेवाग्रामला जाऊन महात्मा गांधीजींचे मार्गदर्शन घेण्याची आज्ञा केली. आंबेकरांनी महात्मा गांधीजींचे आशीर्वाद घेऊन आपल्या सहकाऱ्यांसह गिरणी कामगार चळवळीत प्रवेश केला. या चळवळीत त्यांचे व्यक्तीमत्त्वही तसेच घडत गेले आहे. आंबेकर हे गांधीवादी विचारसरणीचे असून, त्याचा गांधीवाद हा फक्त बोलण्यातून नव्हे तर आचरणात भिनला होता. आपला देश बलवान व संपन्न होण्याकरिता कामगार चळवळीचे पर्यावसन होणे गरजेचे आहे असे ते म्हणत असत. सन १९३८ मध्ये त्यांनी मुंबईत कामगार चळवळीत सहभागी होऊन आपल्या कार्याचा श्रीगणेशा केला. त्यावेळी त्यांनी मुंबईतील शिवडी व कॉटनग्रीन हा भाग निवडला कारण, त्या भागात गिरणी कामगारांची स्थिती हलाखीची होती. कामगारांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागे. पगारवाढ म्हणावी तशी होत नसेशिवाय कामगारांचे इतर प्रश्न ही होतेच. या समस्यांचे निवारण करण्याच्या हेतूने आंबेकरांनी ०३ मे १९४७ रोजी इंडिया ट्रेड युनियन काँग्रेस म्हणजे इंटक या संथेची स्थापना केली. या संस्थेद्वारे सरदार वल्लभभाई पटेल यांच्या अध्यक्षतेखाली एकदा परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या परिषदेत कामगारांचे अनेक ठराव मंजूर करण्यात आले. महाराष्ट्रात या संस्थेच्या सुमारे १३ शाखा सुरु झाल्या. यानंतर दि. २९ सप्टेंबर १९४७ रोजी विजयादशमीच्या मुहूर्तावर राष्ट्रीय मिल मजदूर संघ या संस्थेची आंबेकरांनी स्थापना केली. त्यावेळी नामदार स.का. पाटील हे संस्थेचे अध्यक्ष तर आंबेकर सरचिटणीस होते. मुंबईतील परळ भागात मजदूर मंजिल ही इमारत आजही दिमाखात उभी आहे. 'कामगार' हे साप्ताहिक या संस्थेचे मुखपत्र असून ज्येष्ठ पत्रकार व लेखक शं.ल. चिटणीस हे पहिले संपादक होते. या संस्थेद्वारे आंबेकर यांनी मुंबईमधील ६४ कापडगिरण्याची कामगारांच्या वतीने औद्योगिक न्यायालयात पहिला दावा दाखल केला व त्यावर न्यायालयाने सर्व कामगारांना अडीच महिन्यांच्या पगार बोनस म्हणून देण्यात यावा असा निकाल दिला. एकदा राष्ट्रीय मिल मजदूर संघाच्या कार्यकारिणीची बैठक भरली होती. या बैठकीला माजी हंगामी पंतप्रधान गुलझारीलाल नंदा ही उपस्थित होते. एका महत्त्वाच्या ठरावावर चर्चा चालू होती. ठरावावर सभासदात तीव्र मतभेत झाले होते. प्रत्येक सभासद या ना त्या बाजूने बोलत होता. आंबेकर शांतपणे चर्चा ऐकत होते. ते स्वभावताःच मितभाषी होते. जे काही सांगायचे असेल ते आंबेकर आवाज न चढवता सांगत असत. ते नेहमी मुद्याला धरून बोलत. यामुळे अखेर ते आपले म्हणणे इतरांना पटवून देण्यात यशस्वी ठरत. एकदा आंबेकर यांना कुणीतरी विचारले, की " आपला स्वभाव हा स्थितप्रज्ञ आहे असे मी ऐकले आहे ? त्यावर आंबेकर त्यांना म्हणाले," तुम्हाला माहित नाही का मी स्थितप्रज्ञ आहे. मनात कितीही भडकलो तरी बाहेर मी स्थितप्रज्ञ आहे हे दाखवले पाहिजे". मुंबईतील संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनात आंबेकर यांचे मोठे योगदान होते. त्यांनी सर्व कामगारांना या आंदोलनात सहभागी होण्याचे आवाहन केले. मुंबई केंद्रशासित करण्याचा सरकारच्या निर्णयाचा निषेध करून त्यांनी दि. २० नोव्हेंबर १९५६ रोजी काँग्रेसचे तत्कालीन अध्यक्ष डेबरभाई यांना पत्र लिहिले. आंबेकरांनी कामगार चळवळीनिमित्त अनेक ठिकाणी दौरे केले. त्यांनी स्वित्झर्लंड येथील दुसऱ्या क्रमांकाचे मोठे शहर असलेल्या जिनीव्हा येथे भरलेल्या कामगार परिषदेत गेले. असता तेथील कामगारांना मोलाचे मार्गदर्शन केले. त्यांचे मुंबईतील बकरी व्हिला, लखमसी नप्पू रोड, दादर पूर्व येथे अनेक वर्षे वास्तव्य होते. दि.१३ डिसेंबर १९६४ रोजी वयाच्या ५७ व्या वर्षी त्यांनी कामगारांना पोरके करून कायमचा निरोप घेतला. त्यांच्या सारखा कामगार महर्षी पुन्हा होणार नाही.

ग्राम ऊर्जा स्वराज राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त

मान्याचीवाडीचे महावितरणतर्फे अभिनंदन

◆ मुंबई (प्रतिनिधी) :

केंद्र सरकारच्या राष्ट्रीय पंचायत पुरस्कार सोहळ्यात सातारा जिल्ह्यातील मान्याचीवाडी गावाला ग्राम ऊर्जा स्वराज विशेष पंचायत पुरस्कार मिळाल्याबद्दल गावाचे सरपंच रविंद्र माने यांचे महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थाकीय संचालक मा. लोकेश चंद्र यांनी अभिनंदन केले.

नवी दिल्ली येथे बुधवार दि. ११ डिसेंबर रोजी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते सरपंच रवींद्र माने यांनी हा पुरस्कार व एक कोटी रुपयांचा निधी स्वीकारला. देशभरातील १ लाख ९४ हजार ग्राम पंचायतींनी केंद्र सरकारच्या स्पर्धेत सहभाग घेतला होता. त्यापैकी ४५ ग्रामपंचायतींची पुरस्कारांच्या विविध वर्गवारीसाठी निवड करण्यात आली. शाश्वत विकास ध्येय (एसडीजी) स्थानिक पातळीवर गाठण्यासाठी केलेल्या कामगिरीचा पुरस्कारासाठी विचार करण्यात आला. राज्यातील पहिले सौर ग्राम ठरलेल्या मान्याचीवाडीमध्ये विजेची संपूर्ण गरज सौर ऊर्जेद्वारे अर्थात हरित ऊर्जेद्वारे भागवली जाते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात केंद्र सरकारने प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजना सुरू केली आहे. या योजनेत घरावर सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्प बसविणाऱ्या वीज ग्राहकांना तीन किलोवॅट क्षमतेपर्यंत ७८ हजार रुपये थेट अनुदान मिळते.

सातारा जिल्ह्यातील पाटण तालुक्यातील मान्याचीवाडी हे गाव राज्यातील पहिले सौरग्राम आहे. गावातील घरांची तसेच ग्राम पंचायत कार्यालय, शाळा, पथदिवे, पाणी पुरवठा योजना इत्यादींची विजेची गरज गावातच सौरऊर्जा निर्मिती करून भागविली जाते. मान्याचीवाडीतील सौर ऊर्जानिर्मिती प्रकल्पांचे लोकार्पण ऑगस्ट महिन्यात तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले होते.

महावितरणने राज्यात शंभर गावे सौर ग्राम करण्याची मोहीम हाती घेतली असून तिचे काम चालू आहे. यामध्ये गावातील सर्व घरांवर सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्प बसवून त्या घरांना वीज पुरवठा केला जाईल. त्यासोबत गावातील ग्रामपंचायत कार्यालय, शाळा, रस्त्यावरील दिवे, पाणी पुरवठा यासाठीचा वीजपुरवठाही सौरऊर्जेद्वारे केला जाईल.

मान्याचीवाडी पाठोपाठ पुणे जिल्ह्यातील टेकवडी हे राज्यातील दुसरे सौरग्राम ठरले आहे. या गावातही सर्व घरांना सौर ऊर्जेद्वारे वीज पुरवठा होतो.

जीओचा न्यू ईयर धमाका...

मुंबई (वार्ताहर) : रिलायन्स जिओने आपल्या दरवर्षीच्या न्यू ईयर प्लानची परंपरा कायम ठेवत यंदाही जबरदस्त प्लॅन आणला आहे. रिलायन्स जिओने आपला न्यू ईयर वेलकम प्लॅन लाँच केला आहे. जिओचा नवा मर्यादित काळासाठी उपलब्ध करण्यात आला आहे. मुकेश अंबानी यांच्या मालकीच्या जिओच्या या रिचार्ज पॅकची किंमत २०२५ रुपये आहे. २०२५ च्या किंमतीत ग्राहकांना ४३०० रुपयांचे फायदे मिळणार आहे. जिओच्या या प्लॅनची व्हॅलिडिटी २०० दिवस आहे. या प्लॅन अंतर्गत प्रति दिन २.५ जीबी डेटा ऑफर केला जात आहे.

छाया : अरुण पाटील

खार पश्चिम लिंक रोडवरील बेकायदेशीर बांधकामे बुलडोझर चालवून पाडताना महानगरपालिकेचे कर्मचारी.

उपमुख्यमंत्री अजित पवार, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी घेतली शरद पवार यांची भेट

दिल्या वाढदिवसाच्या शुभेच्छा!

◆ नवी दिल्ली (वार्ताहर) :

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांचा गुरूवारी ८५ वा वाढदिवस झाला. वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शरद पवारांची भेट घेतली. अजित पवार यांनी भेट घेतल्यानंतर केंद्रीय गृहमंत्री अमित शाह देखील शरद पवारांची भेट घेऊन वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.

दरम्यान, अजित पवार यांनी शरद पवारांची भेट घेतल्यानंतर अनेक राजकीय तर्कवितर्क लावले जात आहेत. आज साहेबांचा वाढदिवस, उद्या काकीचा वाढदिवस आहे त्यामुळे या दोघांचे दर्शन घेण्यासाठी आम्ही आलो होतो असे ही अजितदादांनी सांगितले. राजकारणात टीकेपलीकडे काही संबंध जोपसले जातात. मी घरातलाच आहे असे सांगत उपमुख्यमंत्री अजित पवारांनीशरद पवारांच्या भेटीवर प्रतिक्रिया दिली आहे. दिल्लीतील पवारांच्या निवासस्थानी अजित पवारांसह प्रफुल पटेल, सुनील तटकरे, छगन भुजबळ, सुनेत्रा पवारांनी शरद पवारांची भेट घेतली. या नेत्यांचे खासदार सुप्रिया सुळे यांनी स्वागत केले. विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर पहिल्यांदाच अजित पवार-शरद पवारांची भेट झाली. या वेळी दर्शन घेतले, चहापाणी झाले. त्यासोबत इतर गोष्टींवर चर्चा झाली. परभणीला असे का घडले अशा इतर बाबींवर बोललो. संसदेचे कामकाज, मंत्रिमंडळ विस्तार, अधिवेशन याबाबतही चर्चा झाली. राजकीय चर्चा होत असतात असेही उपमुख्य मंत्री अजित पवार यांनी सांगितले.

रुग्णावर केली रोबोटिक गॉलब्लॅडर शस्त्रक्रिया

मुलुंडच्या फोर्टिस हॉस्पिटलमधील डॉक्टर्सना यश

◆ मुंबई (प्रतिनिधी) :

कीर्ती हजारी (वय ५२) यांना पाच महिन्यांपासून प्रचंड पोटदुखी आणि उलट्यांचा त्रास सुरू होता. मुलुंडच्या फोर्टीस हॉस्पिटलमधील डॉक्टरांनी तपासणी केल्यानंतर त्यांना काविळीसह पित्ताशयातील खड्यांचा गुंतागुंतीचा आजार झाल्याचे व पित्ताशय काढून टाकण्याची गरज असल्याचे निदान झाले. त्यानंतर रोबोटिक गॉलब्लॅडर शस्त्रक्रीया करून त्यांच्यावर यशस्वी उपचार करण्यात आले. मात्र कीर्ती यांना उच्च रक्तदाब आणि इस्चेमिक हृदयविकाराची समस्या होती. फोर्टिस हॉस्पिटल, मुलुंडचे कन्सल्टन्ट-गॅस्ट्रोइंटेस्टिनल, लॅप्रोस्कोपिक आणि रोबोटिक सर्जन डॉ. जिग्नेश गांधी आणि कन्सल्टन्ट गॅस्ट्रोएंटेरोलॉजी डॉ. सूर्यप्रकाश भंडारी यांच्या मार्गदर्शनाखाली टीमने काम केले.

रोबोटच्या सहाय्याने केल्या जाणाऱ्या कोलेसिस्टेक्टटोमीचे रुग्ण लवकर बरा होणे, वेदना कमी होणे, हॉस्पिटलमध्ये कमी काळ वास्तव्य करावे लागणे आणि हॉस्पिटलचा खर्च कमी होणे असे लक्षणीय फायदे आहेत.

डॉ. विद्यानिष्ठ मराक यांना 'माय होम इंडिया' संस्थेचा 'वन इंडिया पुरस्कार' प्रदान

◆ मुंबई (प्रतिनिधी) :

जेव्हा समाज उत्तर पूर्व भारताला स्वीकारतो, त्यांना प्रेमाची अनुभूती देतो. तेव्हा उत्तर पूर्व भारत वेगळा आहे. आम्हाला भारतापासून वेगळे व्हायचे आहे हा नॅरेटिव्ह चुकीचा ठरतो, असे 'माय होम इंडिया'चे संस्थापक सुनील देवधर म्हणाले. 'माय होम इंडिया' या संस्थेच्या २० व्या वर्धापन दिनानिमित्त दीनानाथ मंगेशकर नाट्यगृह विलेपार्ले ईस्टमध्ये आयोजित कार्यक्रमात देवधर बोलत होते. यावेळी 'वन इंडिया अवॉर्ड' हा मानाचा पुरस्कार डॉ. विद्यानिष्ठ मराक यांना माधवी लता यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी माधवी लता म्हणाल्या की, पूर्वोत्तर भारत हा अविभाज्य घटक आहे. त्याच्याशिवाय ना पुराण आहे, ना महाभारत. पूर्वोत्तर भारताशिवाय आपण भारताची कल्पनाच करू शकत नाही. प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे की वर्षातून किमान एकदा आपण उत्तर पूर्व भारताला भेट द्यायलाच हवी, असेही त्यांनी नमूद केले. माय होम इंडिया संस्थेतर्फे ईशान्य भारतातील आदिवासी समाज आणि उर्वरित भारत यादरम्यानचे संबंध सुदृढ करण्यासाठी कार्यरत व्यक्तींना मागच्या १३ वर्षांपासून 'वन इंडिया' पुरस्कार दिला जातो. या मालिकेमध्ये यंदा तुरा मेघालय येथील डॉ. मराक यांचा सन्मान करण्यात आला.

डॉ. मराक यांनी पारंपरिक गारो औषध पद्धतीला प्रोत्साहन देण्यासाठी जीवन समर्पित केले आहे. त्यांनी स्थापन केलेल्या 'समाचिक असोसिएशन'च्या माध्यमातून गारो टेकड्यांतील अनेक गावांतील पारंपरिक वैद्यांना ओळख मिळवून दिली आहे. त्यांच्या प्रयत्नांमुळे क्षयरोग आणि मलेरियावर नियंत्रण मिळवण्यात मोठे यश आले आहे.

सारंग दर्शने यांना दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर पत्रकार पुरस्कार जाहीर

नाशिक (प्रतिनिधी) : सार्वजनिक वाचनालय नाशिक या संस्थेतर्फे दरवर्षी दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर पत्रकारिता पुरस्कार देण्यात येतो. सन २०२४ चा पुरस्कार सारंग शंतनू दर्शने यांना जाहीर झाला आहे. या पुरस्काराचे वितरण पुण्याचे दै. सकाळचे संपादक सम्राट फडणीस यांच्या हस्ते रविवार दि. ५ जानेवारी, २०२५ रोजी सायंकाळी ६.००वा. ग्रंथालयभूषण मु.शं. औरंगाबादकर सभागृहात देण्यात येणार असल्याची माहिती वाचनालयाचे अध्यक्ष प्रा.दिलीप फडके व प्रमुख सचिव देवदत्त जोशी यांनी दिली. ११,००० चा धनादेश, स्मृतीचिन्ह, शाल, श्रीफळ असे पुरस्कारचे स्वरूप आहे.

प्रवाशांची सुरक्षितता हेच एसटीचे अंतिम ध्येय...!

भरत गोगावले यांचे प्रतिपाद

◆ मुंबई (वार्ताहर) :

दररोज ५५ लाख प्रवाशांना सुरक्षित सेवा देण्याच्या उददेशाने एसटी महामंडळ गेली ७६ वर्ष काम करीत असून रस्त्यावरील अपघात कमी करण्यासाठी चालकांचे सुयोग्य प्रशिक्षण, त्यांचे मानसिक आरोग्य सुदढ करणे या बरोबरच तांत्रिकदृष्ट्या निर्दोष बसेंस उपलब्ध करुन देणे या त्रिसुत्रीवर यापुढे भर देण्यात येत असून, प्रवाशांची सुरक्षितता हेच एसटीचे अंतिम ध्येय राहील असे प्रतिपादन एसटीचे अध्यक्ष आमदार भरत गोगावले यांनी केले.

भंडारा व नाशिक येथे झालेल्या एसटीच्या अपघाताबरोबरच नुकत्याच बेस्ट चालकाकडून घडलेल्या अपघाताच्या पार्श्वभुमीवर अध्यक्ष गोगावले यांनी एसटी महामंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक बोलावली होती. या बैठकीमध्ये प्रवाशांना सुरक्षित प्रवास उपलब्ध करुन देण्याच्या उद्देशाने चालक प्रशिक्षण, चालकांची निवड चाचणी, चालकाचे मानसिक आरोग्य याबरोबरच तांत्रिकदृष्ट्या निर्दोष वाहन उपलब्ध करून देण्याबददल सखोल चर्चा करण्यात आली. सध्या एसटी महामंडळाच्या चालकांना अपघात होऊ नये, यासाठी दर ६ महिन्याला उजळणी प्रशिक्षण दिले जाते. या प्रशिक्षणामध्ये चालकांच्या मानसिक आरोग्या बरोबरच त्यांचे बस चालवण्याचे कौशल्य विकसित करण्यावर भर दिला जातो. त्यानंतर प्रत्यक्ष वाहन चालन चाचणी घेऊन त्यांना पुनश्च सेवेमध्ये दाखल केले जाते. तसेच कर्तव्यावर असताना संबंधित चालकाने नशापान न करणे याचे काटेकोर पालन केले पाहिजे. ही पद्धत एसटीकडे कार्यरत असलेल्या खाजगी चालकांना देखील वापरण्याच्या सुचना अध्यक्ष गोगावले यांनी एसटी प्रशासनाला दिल्या. या वेळी एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर व एसटीचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

भाडेवाढीचा प्रस्ताव लवकरच शासनाला सादर करणार : कर्मचाऱ्यांचे वाढते वेतन, इंधनाचा वाढता दर, टायर आणि सुटटया भागांची वाढती किंमत विचारात घेऊन सन २०२१ पासुन प्रंलबित असलेली एसटीची तिकीट भाडेवाढ करण्याचा प्रस्ताव लवकरच शासनाला सादर केला जाईल अशी माहिती अध्यक्ष भरत गोगावले यांनी दिली.

छोट्या जाहिराती

CHANGE OF NAME

I HAVE CHANGED MY NAME FROM **KAVINA KASHINATH BIRWADKAR** TO **KAVITA KASHINATH BIRWADKAR** AS PER MAHARASHTRA GAZATTE NO. M-23274651.

प्रहार मुंबई

वाचकांना विनम्र सूचना

वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या प्रहार विविध जाहिरातींतील मजकुराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिराती आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची 'प्रहार' वृत्तपत्र समूह कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पूर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल 'प्रहार' वृत्तपत्र समूहाचे मुद्रक, प्रकाशक संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाहीत, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

प्रश्नपत्रिका, टाइम टेबलचे मिळणार अपडेट

दहावी-बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी मोबाइल 'ॲप'ची निर्मिती

शिक्षण मंडळाचे अनोखे पाऊल

◆ मुंबई (प्रतिनिधी) :

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने (राज्य मंडळ) मोबाइल ॲप्लिकेशनची निर्मिती केली आहे. दहावी-बारावीच्या परीक्षांचे अधिकृत वेळापत्रक, प्रारुप प्रश्नपत्रिका-उत्तरपत्रिका, अन्य माहिती या ॲप्लिकेशनवर उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यामुळे विद्यार्थी-पालक, शिक्षक यांच्यासाठी हे ॲप्लिकेशन उपयुक्त ठरणार आहे.

गेल्या काही वर्षांत दहावी-बारावीच्या परीक्षांबाबत समाजमाध्यमातून चुकीची माहिती पसरवली जात असल्याचे प्रकार निदर्शनास आले आहेत. या चुकीच्या माहितीमुळे संभ्रम निर्माण होतो.

या पार्श्वभूमीवर, विद्यार्थी, पालक, शिक्षकांना नेमकी आणि अधिकृत माहिती उपलब्ध करून देण्यासाठी राज्य मंडळाच्या 'एमबीएसएसई' या मोबाइल ॲप्लिकेशनची निर्मिती करण्याचा निर्णय घेण्यात आला. राज्य मंडळाचे संकेतस्थळ असले, तरी सध्याच्या काळात मोबाइलचा वापर अधिक प्रमाणात केला जातो. ही बाब लक्षात घेऊन स्वतंत्र मोबाइल ॲप्लिकेशन उपयुक्त ठरू शकते.

गुगल प्ले स्टोअरवरून, राज्य मंडळाच्या संकेतस्थळावरील दुव्याद्वारे ॲप्लिकेशन विनामूल्य डाऊनलोड करता येणार आहे, असे राज्य मंडळाचे अध्यक्ष शरद गोसावी यांनी सांगितले.

विद्यार्थी, पालक, शिक्षकांना दहावी-बारावीच्या परीक्षा, राज्य मंडळासंदर्भातील समाजमाध्यमांतील माहितीची सत्यासत्यता ॲप्लिकेशनद्वारे पडताळता येईल. या ॲप्लिकेशनवर दहावी-बारावीच्या परीक्षांचे अधिकृत वेळापत्रक, गेल्या दोन वर्षांतील प्रारुप प्रश्नपत्रिका-उत्तरपत्रिका आणि अन्य सूचना, माहिती उपलब्ध करून देण्यात येत आहे. त्यामुळे हे ॲप्लिकेशन उपयुक्त ठरणार असल्याचेही गोसावी यांनी नमूद केले.

सुनेत्रा पवार दिल्लीत शरद पवारांच्या शेजारी

◆ नवी दिल्ली (वार्ताहर) :

दिल्लीत शरद पवार ६ जनपथ परिसरातील बंगल्यात राहतात. येथे शरद पवार त्यांची लेक आणि खासदार सुप्रिया सुळे यांच्यासोबत राहतात. आता त्यांच्याच समोरच्या बंगल्यात आता ११ जनपथ परिसरात अजित पवारांच्या पत्नी सुनेत्रा पवार राहणार आहेत. त्यामुळे आता दिल्लीत शरद पवार यांनी सुनेत्रा पवा हे पक्के शेजारी बनणार आहेत. खरं तर नियमानुसार पहिल्या टर्ममध्ये खासदार बनणाऱ्या उमेदवाराला या परिसरात बंगला देण्यात येत नाही. मात्र अजित पवारांच्या दिल्लीतील ताकदीमुळे त्यांना हा बंगला देण्यात आला आहे. बारामती लोकसभा मतदार संघात पवार विरूद्ध पवार लढत झाली होती. या लढतीत सुप्रिया सुळे यांनी सुनेत्रा पवार यांचा पराभव केला होता. या पराभवाने अजित पवारांना बारामतीत मोठा झटका बसला होता. त्यानंतर अजित पवारांनी राज्यसभेसाठी सुनेत्रा पवार यांचे नाव पुढे केले होते. येथे सुनेत्रा पवार निवडून राज्यसभेच्या खासदार झाल्या होत्या.

सुविचार- आत्मविश्वासाने आपली क्षमता आणि कौशल्यांची ओळख होते.

असद आणि पश्चिम आशियाई देश

साधारणतः एक आठवड्यापूर्वी सीरियातील बशर अल-असद यांच्या सत्तेचा शेवट होणार आहे याची कल्पनाही कुणी करू शकत नव्हते. मात्र, सीरियातल्या बंडखोर गटांनी अत्यंत आश्चर्यकारकरित्या, सीरियाच्या उत्तर-पश्चिमेकडील इदलिबमध्ये असणाऱ्या त्यांच्या तळावरून, असद राजवटीच्या विरोधात एक मोहीम सुरू केली. सीरियासाठी हा काळ एक टर्निंग पॉईंट ठरू शकतो. २००० साली बशर अल-असद यांचे वडील हाफिज यांचा मृत्यू झाला होता. हाफिज यांनी तब्बल २९ वर्षे देशावर राज्य केले होते. त्यांच्यानंतर बशर यांनीही वडिलांप्रमाणेच अत्यंत कठोर पद्धतीने शासन केले. त्यांची सीरियावर घट्ट पकड होती. बशर अल असद यांना अत्यंत दडपशाहीने चालवली जाणारी एक राजकीय व्यवस्था वारशात मिळाली होती. या व्यवस्थेत विरोधात उठणारा एकही आवाज सहन केला जात नव्हता. बशर सत्तेत आल्यानंतर अनेकांना ते थोडे कमी क्रूर असण्याची आणि मुक्त असण्याची शक्यता वाटत होती, पण अल्पावधीतच ही शक्यता फोल ठरली.

२०११ साली बशर अल-असद यांच्या राजवटीविरुद्ध निघालेले शांततापूर्ण मोर्चे अत्यंत हिंसक पद्धतीने दडपण्यात आले. बशर यासाठी नक्कीच लक्षात राहतील. या दडपशाहीमुळेच पुढे गृहयुद्धाला तोंड फुटले होते. सीरियातल्या गृहयुद्धामुळे पाच लाखांहून अधिक लोकांचा मृत्यू झाला आणि सुमारे साठ लाख लोक विस्थापित झाले. रशिया आणि इराणच्या मदतीने बंडखोरांना चिरडण्यात बशर यांना यश आले आणि ते सत्तेत कायम राहिले. रशियाने आपल्या शक्तिशाली हवाई शक्तीचा वापर केला तर इराणने सीरियाला लष्करी सल्लागार पाठवले आणि शेजारच्या लेबनॉनमध्ये त्याचे समर्थन करणाऱ्या हिजबुल्लाह नावाच्या सशस्त्र गटाने त्यांचे सैनिक सीरियामध्ये तैनात केले. यावेळी मात्र असे काहीही घडले नाही. पहिल्या बंडाला मोडून काढण्यासाठी मदत केलेल्या मित्रराष्ट्रांनी बशर यांची साथ सोडली, कारण हे दोन्ही देश आपापल्या आघाड्यांवर लढत आहेत. इराण रशियाच्या मदतीशिवाय बशर यांचे सैन्य बंडखोरांचा सामना करू शकले नाही, अनेक ठिकाणी या लष्कराला हयात तहरीर अल-शामच्या विरोधात लढण्याची इच्छाही नव्हती असे दिसून आले.

मागच्या आठवड्यात सीरियातील दुसऱ्या क्रमांकाचे शहर असणाऱ्या अलेप्पोवर बंडखोरांनी ताबा मिळवला होता. त्यासाठी त्यांना फारसा विरोधही झाला नाही. त्यानंतर त्यांनी हमा शहर ताब्यात घेतले, आणि होम्स प्रांतातल्या महत्त्वाच्या प्रदेशांवर नियंत्रण मिळवले. सीरियाची राजधानी दमास्कसवर बंडखोरांनी पूर्व आणि दक्षिणेकडूनही चढाई केल्यामुळे दमास्क एकटे पडले आणि काही तासांतच बंडखोरांनी बशर अल-असद यांची राजधानी असलेल्या या शहरावर आणि सत्तेवर नियंत्रण मिळवले. सुमारे पाच दशकांपर्यंत सीरियावर राज्य करणाऱ्या असद कुटुंबाच्या पाडावामुळे या प्रदेशातली सत्ता समीकरणे आता बदलणार आहेत असे दिसतेय.

सीरियात घडलेल्या घटनांमुळे इराणच्या प्रभावाला आणखीन एक मोठा धक्का बसला आहे. इराण आणि हिजबुल्लाह यांच्यासाठी बशर अल-असद यांच्या नियंत्रणाखाली असणारा सीरिया अत्यंत महत्त्वाचा होता. या सशस्त्र गटाला हत्यारे आणि दारूगोळा पुरवण्यासाठी या संबंधांचा वापर केला जायचा. इस्रायलविरुद्ध सुमारे वर्षभर चाललेल्या युद्धामुळे हिजबुल्लाह आधीच कमकुवत झाला आहे. त्यामुळे या संघटनेचे भविष्य सध्या अनिश्चित आहे. येमेनमधल्या हुथी बंडखोर गटालादेखील इराणचे समर्थन होते. या गटावर झालेल्या हवाई हल्ल्यांमुळे हुथींचे मोठे नुकसान झाले आहे. हे सर्व बंडखोर गट, इराकमधल्या सशस्त्र संघटना आणि गाझामधील हमासवर झालेल्या हल्ल्यांमुळे इराणची बाजू कमकुवत झाल्याचे दिसतेय. इराणच्या अस्तित्वावरच प्रश्नचिन्ह निर्माण झाल्यामुळे आता या नवीन परिस्थितीमध्ये इस्रायलमध्ये जल्लोष साजरा होत असेल. तुर्कीयेच्या आशीर्वादामुळेच या सर्व घटना घडल्याचे अनेकांना वाटत आहे. मात्र, सीरियातल्या काही बंडखोर गटांना मदत करणाऱ्या तुर्कीयेने हयात तहरीर अल-शामला मदत केल्याचे नाकारले आहे. तुर्कीयेचे राष्ट्राध्यक्ष रेसेप तय्यप एर्डोगन यांनी काही काळासाठी बशर अल-असद यांच्यावर वाटाघाटी करून घेण्यासाठी दबाव आणला होता. जेणेकरून सीरिया शांत होईल आणि तुर्कीयेमध्ये आलेले सीरियाचे निर्वासित त्यांच्या देशात परतू शकतील.

बांगला देशात आंदोलने का वाढत आहेत?

भारत आणि बांगलादेशात अनेक ठिकाणी एकमेकांविरोधात आंदोलने करण्यात आलेली आहेत. काही दिवसांपूर्वी ढाका विद्यापीठाच्या कॅम्पसमध्ये शेकडो विद्यार्थ्यांनी भारतविरोधी घोषणा देत निदर्शने केली होती. ही परिस्थिती चिघळवण्यात माध्यमांनी त्यांची भूमिका अदा केली आहेच, पण जमिनीवर काही महत्त्वाच्या घटनाही घडल्या आहेत. युनूस सरकारने ऑक्टोबरमध्ये छात्रलीगला बेकायदेशीर घोषित केले, त्यानंतर ते भूमिगत झाले. त्यानंतर छात्र लीगच्या अनेक कार्यकर्त्यांनी हिंदूंशी हातमिळवणी केली आणि ते निदर्शनांमध्ये सहभागी झाले. इथे हिंदू-मुस्लीम असा कोणताही मुद्दा नाही. छात्र लीगच्या लोकांना फक्त युनूस सरकारला आव्हान द्यायचे आहे आणि यामुळेच अल्पसंख्याक समुदायांकडून होणाऱ्या आंदोलनांमध्ये वाढ होत आहे. या संपूर्ण प्रकरणात माध्यमांची भूमिका खूप महत्त्वाची आहे. बांगलादेशातील लोक भारतीय माध्यमांकडे अतिशय काळजीपूर्वक पाहतात आणि त्याचा परिणाम बांगलादेशवर होतो. तिथला समाजही महत्त्वाचा आहे. आसाम, त्रिपुरा, मेघालय यांसारख्या भागात गेल्या काही वर्षांत अनेक नवीन चॅनेल्स आले आहेत, जे अत्यंत विवादास्पद मुद्यांवरच्या बातम्या ठळकपणे दाखवतात. अशा चॅनल्सचा बांगलादेशातील लोकांवरही परिणाम होतो, ज्यामुळे परिस्थिती आणखी बिघडते. युनूस यांना विरोध करणाऱ्या लोकांचे असे म्हणणे आहे की, बांगलादेशात बदल घडवून आणण्यासाठी युनूस यांची निवड झाली होती. निवडणुका होऊन लोकांनी निवडलेले सरकार स्थापन व्हावे अशी अपेक्षा त्यांच्याकडून होती. मात्र, ते सत्तेत येताच बांगलादेशच्या चलनातील नोटांवरून मुजिबूर रहमान यांचा फोटो हटवण्यात आला. याशिवाय इतरही काही घटना घडल्या, ज्यामुळे तणावात वाढ झाली.

लोकनामा

राजकारणातील अविश्वास ...!

भूपेंद्र गणवीर
9834245768
ज्येष्ठ पत्रकार, नागपूर

जनता आणि सरकारमध्ये समन्वय हवा. लोकशाही व्यवस्था त्या पद्धतीने आहे. त्यासाठी विविध यंत्रणा आहेत. त्यांचे काम स्वतंत्र, निःपक्ष व पारदर्शक हवे. त्या सरकारच्या अविभाज्य घटक आहेत. या यंत्रणेतील माणसांमध्ये नैतिकता हवी. ती नसेल तर यंत्रणा पक्षपाती होतात. स्वतंत्रपणे निर्णय घेत नाही. बाह्य इशाऱ्यावर चालतात. पारदर्शकतेला मूठमाती देतात तेव्हा अविश्वास वाढतो. राज्यसभेचे सभापती जयदीप धनखड यांच्याबाबत नेमके असेच घडले. धनखड विरोधात इंडिया आघाडी एकजूट झाली. अविश्वासाची नोटीस दिली त्यावर ७० राज्यसभा सदस्यांच्या स्वाक्षरी आहेत. ७२ वर्षात असे पहिल्यांदा घडले. धनखड हे उपराष्ट्रपती आहेत. सांसदीय व्यवस्थेत उपराष्ट्रपती हे राज्यसभेचे सभापती असतात त्यामुळे हा विषय देशभर चर्चित आहे. सांसदीय कामकाजात सभापतींची भूमिका संरक्षकाची असते. विरोधी पक्ष सदस्यांनी सभागृहात उपस्थित केलेल्या प्रश्नाचे उत्तर सत्तापक्षाला म्हणजे संबंधित खात्याच्या मंत्र्याला द्यावे लागते. उत्तर मिळवून देण्याचे काम सभापतीचे असते. अशावेळी अनेकदा माहिती घेऊन उत्तर देण्याचे निर्देश मंत्र्याला दिले जातात. समाधानकारक उत्तर मिळाले नाही तर प्रश्न रोखून ठेवून पुढे उत्तर देण्यास सांगितले जाते. हे प्रकार अनेकदा घडत आले, ही अपेक्षा विरोधी पक्षांची आहे, त्यात ते खरे उतरत नाहीत हा आरोप आहे. धनखड एवढ्यावरच थांबत नाहीत तर त्यांची वागणूक सत्ता पक्षाच्या प्रवक्त्यासारखी आहे. प्रश्नकर्त्या विरोधी पक्षाच्या सदस्यांना टोकाटोकी करतात. त्यांचे माईक बंद केले जातात. सत्ता पक्षाला संरक्षण देतात. चर्चेतील अनेक विषय काढून टाकतात. यात विरोधी पक्ष सदस्यांना वेगळा न्याय आणि सत्ताधारी सदस्यांना वेगळा न्याय देतात हा पक्षपातीपणा त्यांना भोवला. कॉंग्रेस, तृणमूल, सपा नेत्यांचे सभापतींसोबत अनेकदा खटके उडाले. या पदावर एकेकाळी भाजपचे अध्यक्ष असलेले व्यंकय्या नायडू होते. त्यांच्याबाबत पक्षपाती व्यवहारांचे आरोप झाले नाहीत. असे खटके उडाले नाहीत.

या अगोदर जयदीप धनखड हे पश्चिम बंगाल राज्याचे राज्यपाल होते. तेव्हा तृणमूल कॉंग्रेससोबत खटके उडत. तिथे ते विरोधी पक्ष नेत्यांसारखे वागत. यावरून सत्ताधारी पक्षासोबत खटके उडत. आता राज्यसभेत विरोधी पक्ष सदस्यांसोबत खटके उडत आहेत. प. बंगालच्या वागणुकीचा पुरस्कार म्हणून त्यांना या पदावर आणण्यात आले. आता कोणत्या तरी पदावर डोळा ठेवून ते असे वागत असावे असा संशय आहे. विरोधी पक्षाने धनखड विरोधात अविश्वास प्रस्ताव आणला. हा प्रस्ताव पास होईल एवढे संख्याबळ विरोधकांकडे नाही. मात्र, या प्रस्तावाच्या माध्यमातून संसदे बाहेर धनखड यांच्याबाबत चर्चा सुरू आहे. ही चर्चा नैतिकतेचा आरसा दाखविणारी आहे. सभागृहात सभापती तटस्थ असावेत हिच सर्वांची अपेक्षा आहे. त्याप्रमाणे वागणूक नाही हे दर्शविते, हे टोकाचे पाऊल आहे. हे पाऊल नाईलाजाने उचलावे लागले. त्या कारणांचा पाढा विरोधकांकडून पत्रपरिषदेत वाचण्यात आला. सत्ताधारी आणि विरोधी पक्षात संवाद नाही. कटुता टोकाला पोहचली. परिणामी संसदेचे कामकाज ठप्प आहे.

विरोधी पक्षांनी गौतम अदानी यांच्या घोटाळ्याबाबत स्थगन प्रस्ताव दिला. अमेरिकेच्या न्यायालयाने अदानी कंपनीच्या विरोधात गुन्हा नोंदविण्याचे आदेश दिले. आठ जणांचे अटकेचे वॉरंट काढले. त्या प्रकरणावर चर्चा हवी आहे. त्यासाठी नियमानुसार स्थगन प्रस्ताव दिला. त्यावर चर्चेची मागणी केली. त्या मागणीसाठी गोंधळ सुरू आहे. संसद चर्चेसाठी आहे. यावर चर्चा झाली पाहिजे. या मागणीसाठी संसदेबाहेर प्रदर्शन सुरू आहे. 'मोदी-अदानी एक है तो सेफ है,' 'मोदी-अदानी भाई भाई' अशा घोषणा दिल्या जात आहेत. या प्रश्नावर इंडिया आघाडीतील पक्ष एकजूट आहेत. सभागृह चालविण्याची जबाबदारी सत्ताधारी पक्षाची आहे. मात्र, सत्ताधारी पक्षसुद्धा जार्ज सोरोस प्रकरणावर गोंधळ घालत आहेत. सोरोस यांचे सोरोस फाऊंडेशन आहे. ते जगभरातील लोकशाहीवादी संघटनांना मदत करतात. फोरम ऑफ डेमोक्रेटिक लिडर्स एशिया पॅसिफिकच्या सहअध्यक्ष सोनिया गांधी आहेत. हे पद त्यांच्याकडे अनेक वर्षापासून आहे. सोरोस हे अमेरिकेतील मोठे उद्योगपती आहेत. ते भारत विरोधी आहेत. यावरून भाजपचा सभागृहात गोधळ आहे. सभागृहाचे कामकाज ठप्प करण्यात विरोधी पक्ष आणि सत्ताधारी पक्षही मागे नाही हे चित्र अलीकडे दिसत आहे. सरकार तुमची आहे सोनिया गांधी चुकीचे काही करीत असतील तर कारवाई करा. तुम्हाला कोणी रोखले. तसे न करता केवळ आरोप करावयाचे हा कसला प्रकार होय. महाराष्ट्रातील निवडणुकीच्या काळात प्रदेशाध्यक्ष नाना पटोले व खा. सुप्रिया सुळे यांच्यावर असेच भ्रष्टाचाराचे खोटे आरोप करण्यात आले. प्रचार थांबताच आरोप हवेत उडाले. राजकीय विश्वासार्हता अशा कारणांनी संपते. त्यांची जागा अविश्वास घेत आहे. राजकारण्यांवरील विश्वासाला तडे जाणे योग्य नाही. त्यासाठी राजकारण्यांनी आपले वागणे बोलणे सुधारावे. कारभार पारदर्शी करावा. या देशाला संविधान सोपविताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेले विधान आठवते. संविधान चांगले असून चालत नाही. तर राज्यकर्तेही चांगले असावेत. राज्यकर्ते चांगले नसतील तर संविधान चांगले असूनही उपयोग नाही. लोकांचे कल्याण होणार नाही. सध्याच्या राजकारण्यांचे वागणे सांसदीय परंपरेनुसार दिसत नाही त्यामुळे अविश्वास प्रस्तावाची स्थिती ओढावली. अशीच अविश्वासाची स्थिती निवडणूक व्यवस्थेवर ओढावली आहे. लोकशाही वाचवा, ईव्हीएम हटवा, बॅलेटने निवडणुका घ्या ही मागणी अनेकदा झाली. सध्या ही मागणी महाराष्ट्रात टोकाला पोहचली आहे. नवे सरकार आले. नव्याची नवलाई दिसली. आजाद मैदानावर शपथेचा इव्हेंट झाला. भाजप व मित्र पक्षांचे झाडून मुख्यमंत्री आले. प्रधानमंत्री व अनेक केंद्रीय मंत्र्यांनी हजेरी लावली. खर्चाचा भार सरकारी तिजोरीवर होता. साधेपणा नव्हता. भपका होता. जनतेचा पैसा असा उधळला. तीन दिवसाचे अधिवेशन झाले. आमदारांचा शपथविधी उरकला. नव्या विधानसभा अध्यक्षाची निवड झाली. राहुल नार्वेकर पुन्हा आले. त्यांच्या मागचा कार्यकाळ वादग्रस्त होता. पक्ष फोडाफोडीने गाजला. त्यावरील सर्वोच्च निकाल येणे बाकी आहे. त्यांच्या पदग्रहणाने जुन्या जखमा ताज्या झाल्या. उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेने बहिष्कार घातला. अन्यायाच्या आसुडाचे स्मरण करून दिले. महाराष्ट्राच्या निवडणुकीत महायुतीची हवा नव्हती. जेमतेम बहुमताचा अंदाज हेता. नेत्यांच्या अंदाजापेक्षा जास्त महायुतीला यश मिळाले. इंडिया आघाडीचा दारूण पराभव झाला. त्या दिवसापासून विरोधी पक्षांनी मतांच्या चोरीचा आरोप सुरू केला. ईव्हीएम समर्थक व विरोधकांमध्ये आरोप-प्रत्यारोपाचे युद्ध सुरू आहे. त्यात आग ओतण्याचे काम मारकडवाडीतील गावकऱ्यांनी केले. माळशिरस विधानसभा मतदार संघातून उत्तम जानकर निवडून आले. हा विजय लाखाच्या आघाडीने हवा होता तसे घडले नाही. निसटता विजय मिळाला. यास ईव्हीएम घोटाळा कारणीभूत असल्याचा आरोप केला.

आपला आरोप सिद्ध करण्यास त्यांनी मारकडवाडीत बॅलेट पेपरने निवडणूक घेण्याचा प्रयत्न केला. हा प्रयत्न सरकारी यंत्रणेने हाणून पाडला. मात्र बॅलेट निवडणूक प्रयत्नाने हे गाव चर्चेत आले. ईव्हीएम हटाव आंदोलनाचे प्रतीक बनले. अचानक राजकीय पुढाऱ्यांचे पाऊले त्या गावाकडे वळली. लोकसभेतील विरोधी पक्ष नेते खा. राहुल गांधी हेसुद्धा त्या गावात येणार. तेथून ईव्हीएम हटाव, देश बचावचा नारा देणार अन् लॉगमार्च काढणार अशा बातम्या आहेत. सध्या ईव्हीएमने मतदान होते. ईव्हीपॅटमध्ये कोणाला मतदान केल्याचे आभासी स्वरूपात दिसते. ती चिठ्ठी वेगळी निघावी. मतदाराला चिठ्ठी बघता यावी. वाद निर्माण झाल्यास त्यांची मोजणी व्हावी ही रास्त मागणी आहे ही पारदर्शिकता नाही. निवडणूक आयोग वादात अडकलेत. त्यामुळे बॅलेट पेपरने निवडणुका घेण्याची मागणी वाढली आहे. निवडणूक व्यवस्थेवर अविश्वास दिवसेंदिवस वाढत आहे. आता त्यावर जनआंदोलनाची तयारी सुरू आहे.

वर्तमान

देशातील अंतर्गत सुरक्षा भक्कम असणे आवश्यक!

प्रा. मधुकर चुटे
9420566404

अमेरिका राष्ट्र हे संपूर्ण जगामध्ये शक्तिसंपन्न राष्ट्र म्हणून ओळखले जाते. याकरिता अमेरिकेने सार्वभौमत्व आणि सुरक्षितता या बाबींना अधिक महत्त्व दिले आहे. असाच प्रकार जगातल्या सगळ्या विकसित देशांबाबत कमीअधिक प्रमाणात असलेले पाहायला मिळते. जसे चीन, रशिया, जपान, इंग्लंड या सगळ्या आधुनिक विकसित देशांनी त्यांच्या सीमा सुरक्षित ठेवल्या आहेत. त्याचप्रमाणे देशातील अंतर्गत सुरिक्षिततेलाही मोठ्या प्रमाणात महत्त्व दिले आहे. कोणालाही देशाच्या सुरक्षिततेशी खेळ करू दिला नाही आणि तसा प्रयत्न करणाऱ्यांना त्याची तातडीने शिक्षा देण्याचे कामही याच देशांकडून केले गेले आहे; परंतु देशाच्या सुरक्षिततेशी अनेक वेळेला तडजोड केली गेली आणि त्याचे अनेक परिणामही भोगावे लागले आहेत.

आपल्या भारत देशात असलेल्या संसदीय लोकशाहीचा आणि त्या लोकशाहीने दिलेल्या विचाराच्या स्वातंत्र्याचा मोठ्या प्रमाणात गैरफायदा घेतला गेला. म्हणूनच काश्मीरमध्ये ३७० कलम हटवले गेले नाही आणि तोच प्रकार देशाच्या पूर्वोत्तर भागामध्ये झाला. आसाम, मणिपूर, पश्चिम बंगाल, नागालँड या ठिकाणी सतत काही ना काही संघर्ष धुमसत असतात. या सर्वच प्रांताकडे मोठे दुर्लक्ष केले गेले. तिथल्या स्थानिक लोकांच्या आशा-आकांक्षा दुर्लक्षित राहिल्या आहेत. तिथे लोकशाही मूल्ये केवळ राजकारणापुरतीच महत्त्वाची मानली गेली. आणि या राज्यांमध्ये छोटे छोटे गट काही ना काही मागण्या करून मोठा संघर्ष करीत असतात.

गेल्या काही वर्षांपासून मणिपूरमध्ये अशाच जाती संघर्षाचा मोठा भडका उडाला आहे आणि त्या जाती संघर्षाचाच काही देशविरोधी शक्तीचा अजूनही त्याचा मोठा गैरफायदा घेत आहेत. मैतेई आणि कुकी या दोन जातींमधला आणि काहीसा वांशिक स्वरूपाचा हा संघर्ष आपापल्या वर्चस्वासाठी सुरू आहे; परंतु आता म्यानमार सारख्या देशाचा आधार घेऊन काही बंडखोर गट आता थेट भारतीय सुरक्षा दलांवरच चाल करून घेत आहेत. असाच काही प्रयत्न अलीकडेच मणिपूरच्या जिरिबाम या जिल्ह्यात झाला आणि त्यावेळी सुरक्षा दलांच्या गोळीबारात अकरा बंडखोरांना ठार केले होते.

गेल्या काही दिवसांपासून मणिपूरच्या विविध भागांमध्ये शस्त्रांचे बरेच मोठे साठे जप्त केले होते. भारतीय सुरक्षा यंत्रणा तिथे शांतता निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहेत; परंतु तिथल्या काही गटांना बाहेरून मदत मिळत आहे. आणि म्हणून मणिपूरला सतत धुमसते ठेवण्याचा प्रयत्न होतो आहे. ज्यावेळी सुरक्षा यंत्रणांना अशा प्रकारचे आव्हान देण्याचा प्रयत्न होतो त्यावेळेला तो तितक्याच ताकदीनिशी मोडून काढण्याचीदेखील आवश्यकता आहे. अन्यथा या दहशतवादी प्रवृत्तीचे लोण वाढत जाऊ शकते. देशाच्या इतर भागातही त्याचे मोठे परिणाम होण्याची शक्यता राहू शकते. काश्मीर हे त्याचे अत्यंत ज्वलंत उदाहरण आहे. काश्मीरमधला दहशतवाद जर त्याचवेळी ठेचून काढला असता आणि पाकिस्तान पुरस्कृत दहशतवाद्यांना नेस्तनाबूत केले गेले असते तर कदाचित ३७० कलम रद्दही करावे लागले नसते; परंतु याच ३७० कलमाचा गैरवापर झाला आणि त्यात दहशवाद्यांनाही आश्रय दिला गेला.

शेकडो वर्षांपासून काश्मीरमध्ये राहत असलेल्या हिंदू पंडितांना योजनापूर्वक विस्थापित केले गेले आणि जवळपास हे काश्मीर फुटीरतावाद्यांच्या आणि दहशतवाद्यांच्या तालावर नाचणारे राज्य झाले होते. धक्कादायक बाब म्हणजे तिथे लोकशाही मार्गाने निवडून येणारे राज्यकर्ते सुद्धा काश्मीरमधल्या समस्येबाबत भारत पाकिस्तानशी चर्चा करावी लागेल अशी मागणी करीत असतात.

काश्मीर भारताचा अविभाज्य भाग आहे आणि तिथे निवडून येणारे सरकारही भारताच्या लोकशाही पद्धतीने निवडून येत होते; परंतु पाकिस्तानचीच भाषा बोलायला लागले हे का घडले तर तिथला दहशतवाद योग्यवेळी मोडून काढला गेला नाही. आज काहीशी तशीच परिस्थिती मणिपूरमध्ये होऊ घातली आहे. आता तर थेट भारतीय सुरक्षा यंत्रणांवर हल्ले करण्याचे तिथल्या बंडखोरांचे प्रयत्न सुरू झाले आहेत. म्हणजे आपली दहशत माजवून संपूर्ण राज्य वेठीला धरण्याचा त्यांचा हेतू दिसतो.

अशा प्रकारे देशाच्या अंतर्गत सुरक्षिततेला मोठे आव्हान निर्माण करणाऱ्या दहशतवादी वृत्तींना येग्यवेळीच रोखले गेले पाहिजे. ते जर झाले नाही तर या प्रवृत्ती मणिपूरमध्ये कायमची अशांतता निर्माण करतील. आणि त्याचा परिणाम देशातील इतर भागातही होण्याची शक्यता नाकारता येणार नाही.

भारत हा विकसनशील देश आहे; परंतु आज जगाच्या विकसित देशांसारखी भारताची अर्थव्यवस्था मजबूत होत आहे. अशावेळी भारतातील अंतर्गत सुरक्षितता अधिक सुरक्षित राहणे खूप महत्त्वाचे ठरते. अशांतता किंवा अस्थिरता माजवून देशाच्या अर्थव्यवस्थेलाही नख लावण्याचा प्रयत्न होतो. म्हणजे समाजव्यवस्थेची चौकटही खिळखिळी करण्याचा डाव खेळला जातो. जर भारताला अन्य विकसित देशांप्रमाणे पुढे जायचे असेल तर आपल्या अंतर्गत सुरक्षिततेला महत्त्व देण्याची गरज आहे आणि सर्व प्रकारची किंमत मोजून सार्वभौमत्व टिकवावे लागेल. काश्मीर, मणिपूर, मध्य प्रदेश, महाराष्ट्र, छत्तीसगढ या राज्यांमधला नक्षलवाद हे सगळे गट दहशतवाद आणि हिंसाचाराचा आश्रय घेतात. आणि थेट भारतीय सुरक्षा यंत्रणांवर हल्ले करतात. यातून देशाच्या सार्वभौमत्वाला धक्का पोहोचवण्याचाच कट असतो. ज्याप्रमाणे काश्मीरमधला दहशतवाद मोडून काढला जातो आहे. मणिपूर किंवा भविष्यातील कोणत्याही भागात लष्करी किंवा सुरक्षा यंत्रणांनाच आव्हान दिले जाईल तेव्हा ते कठोरपणे मोडून काढणे अत्यंत गरजेचे आहे.

वास्तव

खासगीकरण-कंत्राटीकरणाचा 'जीवघेणा' अट्टाहास

अनंत बोरसे
9158495037

आजच्या परिस्थितीत खासगीकरण, कंत्राटीकरण तितकेच महत्त्वाचे असले, काही प्रमाणात सोयीसुविधा उपलब्ध होत असल्या तरी याचे अनेक दुष्परिणाम वारंवार समोर येत आहेत आणि यात जनतेची आर्थिक लूट तर होतेच, पण प्रसंगी जीवावरदेखील बेतते. आजच्या घडीला खाजगीकरणामुळे आरोग्य, शिक्षण, अन्न वस्त्र निवारा सगळेच महागले आहे आणि खाजगी क्षेत्र बेहिशेबी लूट करत आहेत. ऊर्जा श्रेत्राचे खासगीकरण झाले आणि दुपटी-तिपटीने वीज बिल जनतेच्या हाती पडत आहे, रस्ते बांधले जात आहेत. मात्र, टोलधाडीने जनतेची बेहिशेबी लूट सुरू आहे.

काही दिवसांपूर्वी मुंबईतील कुर्ला भागात एक बेस्ट बसने अनेकांना चिरडले आणि यात सात जणांचा मृत्यू झाला तर ४९ जण जखमी झाले. अपघात घडला त्या बसचा चालक काही दिवसांपूर्वीच बेस्ट सेवेत कंत्राटी पद्धतीने एका एजन्सीमार्फत भरती झाला होता आणि त्याच्याकडे जड वाहन चालविण्याचा परवानादेखील नव्हता आणि विशेष म्हणजे ५४ वर्षाच्या चालकाची नवीन भरती केली गेली होती. आता सर्व दोष चालकाला दिला जात आहे, मात्र मुंबईतील बेस्ट असो की इतर परिवहन सेवा किंवा सरकारी खाते, सार्वजनिक उपक्रम, बँका सगळीकडे गेल्या काही वर्षांपासून कंत्राटीकरण, खासगीकरणाचे भूत स्वार झाले आहे आणि याला कारण दिले जाते, ते व्यवसाय करणे सरकारचे काम नाही आणि सेवासुविधा देण्याएवढा खर्च सरकार करू शकत नाही, मात्र त्याच वेळी करोडो रुपयांचा चुराडा, भ्रष्टाचार होतो तो सरकारी खात्यांमध्येच. सरकारचे, जनतेचे हित जपण्यापेक्षा कमिशन, टक्केवारी आपल्या आवडत्या कंत्राटदारालाच देण्याचा अट्टाहास का धरला जातो हे 'ये पब्लिक है ये सब जानती है'. जवळपास सगळेच क्षेत्र खासगीकरण, कंत्राटीकरणासाठी खुले गेले आहे. आता फक्त सरकारचे कंत्राटीकरण आणि खाजगीकरण व्हायचे बाकी आहेत. आजच्या परिस्थितीत खासगीकरण, कंत्राटीकरण तितकेच महत्त्वाचे असले, काही प्रमाणात सोयीसुविधा उपलब्ध होत असल्या तरी याचे अनेक दुष्परिणाम वारंवार समोर येत आहेत आणि यात जनतेची आर्थिक लूट तर होतेच, पण प्रसंगी जीवावरदेखील बेतते. आजच्या घडीला खाजगीकरणामुळे आरोग्य, शिक्षण, अन्न वस्त्र निवारा सगळेच महागले आहे आणि खाजगी क्षेत्र बेहिशेबी लूट करत आहेत. ऊर्जा श्रेत्राचे खासगीकरण झाले आणि दुपटी-तिपटीने वीज बिल जनतेच्या हाती पडत आहे, रस्ते बांधले जात आहेत. मात्र, टोलधाडीने जनतेची बेहिशेबी लूट सुरू आहे.

जनतेच्या मूलभूत गरजा असलेल्या अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, आरोग्य, दळणवळण, पाणी उपलब्ध करून देण्याची जबाबदारी शासन-प्रशासनाची आहे, आणि त्यासाठीच ही व्यवस्था निर्माण करण्यात आली आहे, मात्र गेल्या ७०-७५ वर्षानंतरही जनतेचे प्रश्न आहे तसेच आहे. जनतेच्या पैशातून सरकार, कार्यपालिकेचा करोडो रुपयांचा खर्च केला जातो, मात्र तो जातो कुठे हे अनाकलनीय आहे. सर्वच व्यवस्था सरकार करू शकत नाही हे लक्षात आल्याने काही क्षेत्र काही प्रमाणात खासगी क्षेत्राला खुले गेले, काही विकास कामे बांधा-वापरा आणि हस्तांतरित करा या तत्त्वावर केली गेली. १९९१ पासून जागतिक आर्थिक उदारीकरणाचा स्वीकार करावा लागला आणि तेव्हापासून खासगीकरण, कंत्राटीकरण आवडे सर्वांना विशेषतः राज्य व्यवस्थेला आणि ज्यांनी सार्वजनिक हित, जनहित जायचेच तेच खासगीकरण, कंत्राटीकरणाचा अट्टाहास करत आहे. यात अशा दुर्घटना घडून मोठ्या प्रमाणावर जीवितहानी, वित्तहानी होते याची जबाबदारी कोण घेणार? दुर्घटना घडली की नेहमीप्रमाणे चौकशांचा फार्स होतो, कोणालाही सोडणार नाही, दोषींना शिक्षा होणारच अशी राणाभीमदेवी थाटात घोषणा होणार, आर्थिक मदतीची घोषणा होणार, काहींना थोडीफार कधीतरी मिळणार, पुढे कालांतराने पुन्हा एखादी दुर्घटना घडणार हे चित्र बदलणार तरी कोण, कसे आणि कधी?

शहापूर, जि. ठाणे

वाचक विचार मंच

पृथ्वीचे नजीकच्या काळात वाळवंट होण्याची मोठी शक्यता!

संयुक्त राष्ट्र वाळवंटीकरण प्रतिबंध समितीने एक अहवाल तयार केला आहे. त्यानुसार पृथ्वीवरील हरितगृह वायू उत्सर्जन रोखले नाही तर येत्या काही वर्षांमध्ये ३ टक्के आर्द्र जमीन कोरडी होण्याची शक्यता आहे. गेल्या सुमारे तीस वर्षांमध्ये पृथ्वीवरील जवळपास ७७ टक्के जमीन कोरडी झाली आहे. या भागात पाण्याचे प्रमाण अत्यल्प आहे याचा थेट परिणाम माणसाच्या आयुष्यावर होणार असून उपजीविकेला धोका निर्माण होणार आहे. याचा थेट परिणाम भारतावरसुद्धा होणार आहे. भारताचा एक मोठा प्रदेश कोरडा पडणार असून चीनलासुद्धा याचा मोठा धोका आहे. भारताप्रमाणे पाकिस्तान, इजिप्त, अमेरिका, दक्षिण ऑस्ट्रेलिया इत्यादी प्रदेशालासुद्धा याचा परिणाम होऊ शकतो. कोरड्या जमिनीवर राहणाऱ्या लोकांची संख्या २१०० पर्यंत सुमारे ५ अब्ज एवढी होण्याची शक्यता आहे. एकेकाळी असे म्हटले जात होते की भविष्यात पाण्यासाठी युद्धे होतील ही बाब आता अगदी जवळ आली आहे. एकूणच पर्यावरणाचा ऱ्हास यास कारणीभूत आहे हे सारे मानवानेच केले आहे. साहजिकच त्याचे बरे वाईट परिणाम मानवाला भोगावे लागणार आहेत.

शांताराम वाघ
मो.नं.:+९१ ९६२३४ ५२५ ५३

गुल्लेर

मावशीचे समोसे

नरेंद्र इंगळे
9561226572

'बंड्या आहे काय रे खोलीत?'

'तुम्ही कसे आले बाबा एकदम? फोन नाही काही नाही?'

'अरे मी फवाऱ्याची औषध घ्याले आलो होतो.. येता-येता तुह्या खोलीवर चक्कर मारला.'

'बसा ना बाबा..'

'मावसबहिनी लय करून ठेवल्या रे तुह्या.'

'म्हनजे?'

'आताच तुह्या खोलीतून एक पोरगी बाहीर निंगाली. म्या तिले परिचय विचारला.. ते म्हने, मी बंडूची मावसबहीन आहो.'

'ते काय.. मले मावसभाऊ मानते..'

'काय नाव तिचं?'

'रिंकू हाय तिचं नाव.. आमच्या कॉलेजात असते.'

'कोन्या नात्यानं ते तुही मावसबहीन लागते? तुह्या मावशीले पोरगीच नाही.'

'मानलेली मावसबहीन आहे ते.. तिच्या आईले मी मावशी म्हनतो.'

'कायले आलती ते पोरगी?'

'प्रॉब्लेम विचाराले आली होती. तिले काही अभ्यासात अडचन आली की मी तिले गाईड करतो

एलन मस्कची संपत्ती ४४७ अब्ज डॉलर्स

बनले जगातील सर्वात श्रीमंत व्यक्ती

वृत्तसंस्था...

न्यूयॉर्क : स्पेस एक्सचे संस्थापक आणि टेस्लाचे एलन मस्क ४०० अब्ज डॉलर्स एवढी निव्वळ संपत्ती असणारे इतिहासातील पहिले व्यक्ती बनले आहेत. ब्लूमबर्ग बिलियनर्स इंडेक्सनुसार, मस्क यांची संपत्ती ४४७ अब्ज डॉलर्सवर पोहोचली आहे. विशेष म्हणजे गेल्या महिन्यात झालेल्या अमेरिकेतील राष्ट्राध्यक्ष निवडणुकीनंतर त्यांच्या संपत्तीत लक्षणीय वाढ झाली आहे. या यादीत ॲमेझॉनचे संस्थापक जेफ बेझोस एकूण २४९ अब्ज डॉलर्स संपत्तीसह दुसऱ्यास्थानी आहेत. तर मेटाचे मुख्य कार्यकारी अधिकारी मार्क झुकेरबर्ग २२४ अब्ज डॉलर्ससह तिसऱ्या स्थानावर आहेत. मस्क यांच्या संपत्तीत झालेल्या वाढीचे श्रेय त्याची खासगी अंतराळ संशोधन कंपनी एर्ज्मैं च्या अंतर्गत शेअर विक्रीला दिले जात आहे. नुकत्याच झालेल्या इनसाइडर शेअर्सच्या विक्रीमध्ये SpaceX ने कर्मचारी आणि कंपनीच्या इनसाइडर्सकडून १.२५ अब्ज डॉलर्स किमतीचे शेअर्स खरेदी केले होते.

बीएनपीचा ढाका ते अगरतळा मोर्चा

भारत अलर्ट : सीमेवर वाढला तणाव

वृत्तसंस्था...

ढाका : त्रिपुराच्या अगरतळा येथे बांगलादेशी उच्चायोगात तोडफोड झाल्याच्या विरोधात खालिदा जिया यांच्या बांगलादेश नॅशनलिस्ट पार्टीशी (बीएनपी) निगडित संघटनांनी मोठी घोषणा केली आहे. बीएनपीच्या तीन सहकारी संघटना जातीयतावादी जुबो दल, स्वेचसेबक दल आणि छात्र दलाने ढाका ते अगरतळाच्या दिशेने मोर्चा सुरू केला आहे. हा मोर्चा बुधवारी सकाळी ९ वाजता ढाक्यातील नयापलटनमध्ये बीएनपीच्या मध्यवर्ती कार्यालयासमोरून सुरू झाला आहे. हे पाहता भारताच्या सुरक्षा यंत्रणादेखील सतर्कता बाळगत आहेत. केवळ बांगलादेशच्या सहाय्यक उच्चायोगावर हल्ला झाला नसून आमच्या राष्ट्रीय ध्वजाचा अपमान करत सांप्रदायिक दंगली भडकविण्याचा कट रचण्यात आला असल्याचा दावा बीएनपीच्या सहकारी संघटनांनी केला आहे.

प्रयागराज कुंभमेळ्याचे मुख्यमंत्र्यांना आमंत्रण

वृत्तसंस्था

पणजी : प्रयागराज येथील त्रिवेणी संगमावर होणाऱ्या धार्मिक महाकुंभाला उपस्थित राहण्यासाठी मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांना उत्तर प्रदेश सरकारने खास निमंत्रण दिले आहे. उत्तर प्रदेशचे मंत्री दारासिंग चौहान व राज्यमंत्री रामकेश निषद यांनी सावंत यांना मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्यातर्फे आमंत्रण पत्रिका दिली.

प्रयागराज येथे बारा वर्षांनंतर महाकुंभमेळा होतो. 'गोमंतकीय जनतेतर्फे मी अभिमानाने या आमंत्रणाचा

उत्तर प्रदेशच्या मंत्र्यांनी दिली आमंत्रण पत्रिका

स्वीकार केला', असे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी म्हटले आहे. सनातन भारतीय संस्कृतीचा भाग असलेला महाकुंभमेळा हा धार्मिक व आध्यात्मिक उत्सव आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या प्रयत्नामुळे महाकुंभमेळाला युनेस्कोकडून 'मानवता जपणारा सांस्कृतिक वारसा उत्सव' म्हणून मान्यता मिळालेली आहे. यंदा १३ जानेवारी २०२५ ते २६ फेब्रुवारी २०२५ दरम्यान महाकुंभमेळा होणार आहे.

आम्हीं कोणत्याही कारवाईस तयार पण पुरावे द्या– आप

वृत्तसंस्था

पणजी : आम आदमी पक्षाच्या नेत्यांनी मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांची किंवा त्यांच्या पत्नीची मानहानी केल्याचे पुरावे द्यावेत. त्यानंतर आम्ही अब्रुनुकसानीचा दावा किंवा अन्य कोणत्याही कारवाईस तयार आहोत, अशी प्रतिक्रिया पक्षाचे नेते वाल्मिकी नाईक यांनी दिली. गुरुवारी पणजीत झालेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी फ्रान्सिस कुएलो, रोहन नाईक आणि सलमान खान उपस्थित होते.

वाल्मिकी नाईक म्हणाले की, गोव्याचे माजी राज्यपाल सत्यपाल मलिक यांनी मुख्यमंत्री आणि त्यांच्या पत्नीचे नाव घेतले होते. ते जे बोलले होते तेच आम्ही परत सांगितले. मुख्यमंत्र्यांनी आधी त्यांच्यावर अब्रुनुकसानीचा दावा करावा. आम्हीदेखील कोणत्याही कारवाईस तयार आहोत. या प्रकरणात भाजप सरकार विरोधकांना घाबरवण्याचा प्रयत्न करत आहे. मात्र, आम्ही शांत राहणार नाही. हे प्रकरण जेव्हा पासून सुरू झाले तेव्हापासून संशयित किंवा तक्रारदारांना अप्रत्यक्षपणे भीती घालण्यात येत आहे. आधी संशयितांची मालमत्ता जप्त करणार, असे सांगून त्यांना गप्प केले. त्यानंतर पैसे देणाऱ्यांवर कारवाई करणार, असे वक्तव्य करून तक्रारदारांना भीती घातली.

सीरियाबाबत इस्त्रायल-अमेरिकेचे कारस्थान ; आयोतोल्लाह अली खामेनी यांचा आरोप

वृत्तसंस्था

तेहरान (इराण) : सीरियामध्ये सुरू असलेल्या परिस्थितीच्या मुद्यावरून इराणचे सर्वोच्च नेते आयोतोल्लाह अली खामेनी यांनी अमेरिका आणि इस्त्रायलला लक्ष्य केले आहे. या दोन्ही देशांनी सीरियाला अस्थिर बनवण्यासाठी एक संयुक्त कारस्थान केल्याचा आरोप त्यांनी केला आहे. अशांतता निर्माण करण्यासाठी शेजारच्या देश महत्त्वाची भूमिका बजावत आहे.

या संदर्भातील प्राथमिक कारस्थान अमेरिका आणि झिओनिस्ट शासनाकडून केले गेले आहे. सीरियामध्ये जे काही घडते आहे, तो अमेरिका आणि इस्त्रायलच्या संयुक्त कारस्थानाचा परिणाम आहे. याबद्दल कोणाच्याही मनात शंका असता कामा नये, असे खामेनी यांनी एक्सवर केलेल्या पोस्टमध्ये म्हटले आहे. सीरियाच्या शेजारच्या देशाने या कारस्थानात महत्त्वाची भूमिका बजावली आणि अजूनही तसेच केले जात आहे. आमच्याकडे त्या संदर्भातील पुरावे आहेत. याबद्दल कोणाच्याही मनात शंका नाही. ताबा मिळवलेल्या सीरियाच्या भूमीला देशातल्या युवकांद्वारे स्वतंत्र केले जाईल, असा विश्वासदेखील त्यांनी व्यक्त केला.

बिबट्याच्या हल्ल्यात अकराशे पशुधनाचा बळी

देशोन्नती वृत्तसंकलन

नाशिक : नाशिक पूर्व वनक्षेत्रातील दिंडोरी, कळवण, येवला, कनाशी, चांदवड, मालेगाव, ताहराबाद आदी क्षेत्रात बिबट्यांचे हल्ले वाढले असून, वर्षभरात ११०९ पशुधन बळी पडले आहे. तर चार नागरिक जखमी, तर एकाचा मृत्यू झाला आहे. दिंडोरी, नांदगाव, येवला, कनाशी, मालेगाव, सटाणा, ताहराबाद आदी क्षेत्रात ऊस लागवड मोठ्या प्रमाणात असल्याने या भागात बिबट्यांची संख्या वाढली आहे. उसाची पूर्ण वाढ होण्यास जवळपास १० महिने लागतात. यामुळे बिबट्या अन् त्याची पिले उसाच्या पीकक्षेत्रात जवळपास ९ महिने राहतात.

परिणामी या भागात बिबट्यांची संख्या वाढल्याचे दिसून येते. उपजीविकेसाठी शिकार करावी लागत असल्याने बिबट्यांकडून या भागात पशुधनावर हल्ल्यांच्या प्रमाणातही वाढ झाली आहे. वर्षभरात बिबट्यांकडून जिल्ह्यातील १२ वनक्षेत्रांमध्ये सुमारे ११०९ पशुधनाची शिकार करण्यात आली. तर

विविध वनक्षेत्रात ९९ शेतीपिकांचे नुकसान झाले. नाशिक पूर्व वनपरिक्षेत्रातील दिंडोरी, कळवण, देवळा अन् ताहाराबाद येथे ५ जणांवर बिबट्याने हल्ला केला. यात दिंडोरीतील वनारवाडी येथे राहणाऱ्या विठ्ठल भिवा पोतदार (१६) या मुलाचा मृत्यू झाला. बिबट्याच्या हल्ल्यात मृत्यू झाल्यास २५ लाख रुपये नुकसानभरपाई देण्याची तरतूद आहे. पोतदार कुटुंबीय हे सातत्याने रोजगारासाठी स्थलांतरित होत असते. पोतदार कुटुंबाकडून बँकेच्या कागदपत्रांची पूर्तता होत नसल्याने शासकीय मदत थांबली आहे.

महाराष्ट्र ॲक्युपंक्चर परिषदेने दिली १२ नवीन महाविद्यालयांना मान्यता

राज्यात प्रथमच ॲक्युपंक्चर उपचार

वृत्तसंस्था...

नवी मुंबई : विद्यार्थ्यांना राज्यात ॲक्युपंक्चर अभ्यासक्रमाचे शास्त्रशुद्ध शिक्षण आणि नागरिकांना उत्तम व दर्जेदार उपचार मिळावे यासाठी महाराष्ट्र ॲक्युपंक्चर परिषदेने राज्यात १२ नवीन ॲक्युपंक्चर महाविद्यालयांना मान्यता दिली आहे. ही नवीन महाविद्यालये १ डिसेंबरपासून सुरू झाली असून, यापैकी अनेक महाविद्यालयांना विद्यार्थ्यांकडून चांगला प्रतिसाद मिळाला आहे.

ॲक्युपंक्चर उपचार पद्धती शिकविणाऱ्या महाविद्यालयांचे पहिलेच वर्ष असल्याने रिक्त जागांवर प्रवेश दिला जात आहे. या नव्या १२ महाविद्यालयांमुळे देशात मान्यताप्राप्त पदवी व पदविका अभ्यासक्रम सुरू करणारे महाराष्ट्र पहिले राज्य ठरले आहे. या अभ्यासक्रमाला केंद्रीय आरोग्य मंत्रालय आणि महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाकडून मान्यता मिळाली आहे. विद्यापीठाकडून पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या मान्यतेसाठी पुढील काही महिन्यांमध्ये प्रयत्न करण्यात येतील. पदव्युत्तर अभ्यासक्रमही लवकर सुरू होण्याची शक्यता असल्याची माहिती परिषदेतील अधिकाऱ्याने दिली.

६०० जागा उपलब्ध

महाराष्ट्र ॲक्युपंक्चर परिषदेने महाराष्ट्र ॲक्युपंक्चर चिकित्सा पद्धती अधिनियम २०१५ अंतर्गत फेब्रुवारी २०२३ मध्ये राज्यात ॲक्युपंक्चर महाविद्यालये सुरू करण्याची प्रक्रिया सुरू केली होती. राज्यातील ५० संस्थांनी ॲक्युपंक्चर महाविद्यालये सुरू करण्यासाठी प्रतिसाद दिला होता. त्यापैकी निवड केलेल्या १२ संस्थांना परिषदेने मान्यता दिली. प्रत्येक महाविद्यालयांत ५० जागांना मान्यता दिली आहे. यामुळे राज्यात ॲक्युपंक्चर उपचार पद्धतीच्या ६०० जागा उपलब्ध झाल्या आहेत.

'त्या' पीडित कुटुंबाचे पत्र येताच राहुल गांधी हाथरसमध्ये दाखल

वृत्तसंस्था

हाथरस : काँग्रेसचे माजी अध्यक्ष राहुल गांधी आज सकाळी हाथरसमध्ये सामूहिक बलात्कार पीडितेच्या कुटुंबीयांची भेट घेण्यासाठी पोहोचले आहेत. राहुल गांधी आज हाथरसच्या बूल गढी गावात पोहोचले. त्यांच्या या दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर पोलिसांनी जिल्ह्यातील गावात व परिसरात पोलिसांचा बंदोबस्त वाढवला आहे.

१४ सप्टेंबर २०२० रोजी हाथरस गावात एका १९ वर्षीय दलित मुलीवर सामूहिक बलात्कार करण्यात आला होता. त्यानंतर या प्रकरणातील तीन आरोपींची निर्दोष मुक्तता झाल्यानंतर पीडित कुटुंबाने राहुल गांधींना पत्र लिहून न्यायाची याचना केली. त्यानंतर राहुल गांधी आज पीडितेच्या कुटुंबीयांची भेट घेण्यासाठी या ठिकाणी दाखल झाले. तर दुसरीकडे उपमुख्यमंत्री ब्रजेश पाठक यांनी राहुल गांधींच्या हाथरस दौऱ्यावर तिखट प्रतिक्रिया दिली आहे.

डॉक्टर बलात्कार हत्या प्रकरणात नवा ट्विस्ट

वृत्तसंस्था...

कोलकाता : पश्चिम बंगालची राजधानी कोलकाता येथील मेडिकल कॉलेजमध्ये ९ ऑगस्ट रोजी झालेल्या महिला डॉक्टरच्या बलात्काराच्या हत्येप्रकरणी पुन्हा एकदा ट्विस्ट आला आहे. पीडितेच्या वकील वृंदा ग्रोवर यांनी या खटल्यातून तिचे नाव मागे घेतले आहे. ग्रोव्हरने सर्वोच्च न्यायालय, कलकत्ता उच्च न्यायालय आणि सियालदह ट्रायल कोर्टातील खटल्यातून माघार घेतल्याची माहिती दिली. या निर्णयामागील काही मध्यस्थ घटक आणि परिस्थिती त्यांनी नमूद केली. या घटनेनंतर या प्रकरणाशी संबंधित लोकांना हा प्रकार कसा घडला याचा धक्का बसला आहे.

वृंदा ग्रोव्हरने एक निवेदन

पीडितेच्या वकिलाने प्रकरण सोडले

जारी केले आहे. त्यांनी म्हटले आहे की, त्यांची टिम सप्टेंबर २०२४ पासून पीडित कुटुंबाला मोफत कायदेशीर सेवा देत आहे. त्यांच्या टिममध्ये वकील सौतिक बॅनर्जी आणि अर्जुन गुप्तू यांचा समावेश होता, ज्यांनी एका नव्हे तर अनेक कोर्टात कुटुंबाचे प्रतिनिधित्व केले. निवेदनात म्हटले आहे की, खटल्यादरम्यान फिर्यादी पक्षाच्या ४३ साक्षीदारांचे पुरावे नोंदवून आरोपींच्या जामिनाला यशस्वी विरोध करण्यात आला. वकील आणि कुटुंबियांमध्ये मतभेद असल्याच्या बातम्या आल्याने हा निर्णय घ्यावा लागल्याचेही समोर आले आहे.

वकिलाचे नाव मागे घेण्याच्या निर्णयावर सध्या काही प्रतिक्रिया उमटत आहेत. या घटनेची आपल्याला माहिती नसल्याचे पीडितेच्या वडिलांनी सांगितले. सोशल मीडियावर अनेक जण या निर्णयावर चिंता व्यक्त करत आहेत, तर काहींनी याला कायदेशीर प्रक्रियेचा भाग म्हटले आहे.

पाकिस्तानात लष्कराविरोधात बोलण्यास मनाई!

लाहोर : सोशल मीडियावर पाकिस्तानी लष्कराविरोधात अपप्रचार केल्याप्रकरणी १५० संशयितांवर गुन्हा दाखल करण्यात आला असून त्यापैकी २२ जणांना अटक करण्यात आली आहे. अटक करण्यात आलेले बहुतांश लोक माजी पंतप्रधान इम्रान खान यांच्या पक्षाशी संबंधित आहेत. सोशल मीडियावर चुकीची माहिती पसरवणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यासाठी सरकार वचनबद्ध आहे. एका अधिकाऱ्याने बुधवारी याबाबत माहिती दिली. अशा घटकांवर कारवाई करण्यासाठी सरकारने फेडरल इन्व्हेस्टिगेशन एजन्सीच्या प्रमुखाच्या अध्यक्षतेखाली एक विशेष कार्य दल स्थापन केले आहे.

इस्त्रायलमध्ये ३० इराणी हेरांना अटक!

नऊ स्लीपर सेलची इराणसाठी हेरगिरी

देशोन्नती वृत्तसंकलन

तेल अवीव : इराणसाठी हेरगिरी केल्याच्या आरोपाखाली इस्त्रायलने ३० हून अधिक ज्यू नागरिकांना अटक केली आहे. हे ज्यू नागरिक नऊ स्लीपर सेलमध्ये इराणसाठी हेरगिरी करत असल्याचा आरोप आहे. इराणने इस्त्रायलमध्ये केलेली ही सर्वात मोठी घुसखोरी मानली जात आहे. कथित सेलच्या अपूर्ण उद्दिष्टांमध्ये इस्त्रायली अणुशास्त्रज्ञ आणि माजी लष्करी अधिकाऱ्यांची हत्या समाविष्ट होती. त्याच वेळी, एका गटाने इस्त्रायली लष्करी तळ आणि हवाई संरक्षणाची माहिती गोळा केली होती. या घटनेचे वर्णन इस्त्रायली गुप्तचर संस्था मोसाद आणि शिन बेटसाठी मोठा धक्का असल्याचे सांगितले जात आहे.

गत आठवड्यात शिन बेट आणि इस्त्रायली पोलिसांनी सांगितले की वडील आणि मुलाच्या टिमने ते राहत असलेल्या गोलान हाइट्ससह इस्त्रायली लष्करी क्रियाकलापांचा तपशील प्रदान केला आहे. इस्त्रायली लष्करी आणि सुरक्षा अधिकाऱ्यांनी सांगितले की, इराणी गुप्तचर अधिकाऱ्यांनी गेल्या दोन वर्षात सामान्य इस्त्रायली नागरिकांना गुप्तचर माहिती गोळा करण्यासाठी आणि पैशाच्या बदल्यात हल्ले करण्यासाठी भरती करण्यासाठी केलेल्या सातत्यपूर्ण प्रयत्नानंतर ही अटक करण्यात आली आहे.

नवी दिल्ली : भारतीय अंतराळ संशोधन संस्थेला (इस्रो) मोठे यश मिळाले आहे. इस्रोच्या ए२० क्रायोजेनिक इंजिनची यशस्वी चाचणी घेण्यात आली आहे. या चाचणीत इंजिनने सामान्य वातावरणीय परिस्थितीत आपली कार्यक्षमता सिद्ध केली आहे. त्यात एक विशेष तंत्रज्ञान समाविष्ट करण्यात आले, ज्याला 'रीस्टार्ट एनेबलिंग सिस्टम' असे म्हणतात. अंतराळ संस्थेने गुरुवारी ही माहिती दिली.

जपानमध्ये चार दिवसांचा वर्क वीक

नागरिकांना कुटुंबासोबत वेळ घालण्याची संधी

टोकियो : जपानची राजधानी टोकियोमधील घटत्या लोकसंख्येच्या पार्श्वभूमीवर सरकारने मोठे पाऊल उचलण्याचा निर्णय घेतला आहे. येथे लवकरच चार दिवसांचा वर्क वीक लागू करण्यात येणार आहे. या उपक्रमाचा उद्देश लोकांना कुटुंबासोबत अधिक वेळ घालवण्याची संधी देणे, त्याद्वारे त्यांना अधिक मुले होण्यास प्रवृत्त करणे हा आहे.

टोकियोच्या गव्हर्नरने जाहीर केले आहे की १ एप्रिलपासून कर्मचाऱ्यांना आठवड्यातून तीन दिवस सुट्टी मिळेल. याव्यतिरिक्त, ज्या कर्मचाऱ्यांची मुले प्राथमिक शाळेत आहेत त्यांना वेळेवर कामावरून घरी जाण्याची परवानगी दिली जाईल. राज्यपाल म्हणाले, 'आम्ही अशी व्यवस्था निर्माण करू, ज्यामध्ये कोणालाही करिअर आणि कुटुंबात तडजोड करावी लागणार नाही. आरोग्य मंत्रालयाच्या आकडेवारीनुसार, जपानचा सध्याचा जन्मदर फक्त १.२ टक्के आहे, तर लोकसंख्या स्थिर ठेवण्यासाठी हा दर २.१ टक्के असावा. हा दर वाढला नाही तर येत्या १२० वर्षांत जपान जगाच्या नकाशावरून गायब होऊ शकतो, असे तज्ज्ञांचे म्हणणे आहे.

'पुष्पा 2' पाहायला गेला अन् तो कानाला चावला

वृत्तसंस्था

ग्वाल्हेर : देशभरात सध्या पुष्पा २ चित्रपट गाजत आहे. दरम्यान ५ डिसेंबरला प्रदर्शित झालेल्या अल्लू अर्जुनच्या या चित्रपटामुळे अनेक वादही झाल्याचे पाहायला मिळाले. अशात आता मध्य प्रदेशातील ग्वाल्हेरमधून आणखी एक धक्कादायक घटना समोर आली आहे. ग्वाल्हेरमधील एका चित्रपटगृहाच्या कॅन्टीन मालकाने पुष्पा २ चित्रपट पाहायला आलेल्या प्रेक्षकाच्या कानाचा चावा घेतल्याचा आरोप आहे. याबाबत पोलिसांमध्ये तक्रार दाखल करण्यात आली आहे. या प्रकरणातील पीडित ग्वाल्हेरमधील एका चित्रपटगृहात पुष्पा २ पाहायला गेला होता. चित्रपटाचा मध्यांतर झाल्यावर पीडित उपहार गृहातून काही खाद्यपदार्थ आणायला गेला. त्यावेळी पीडित आणि उपहारगृहाच्या मालकामध्ये पैशांवरून वाद झाला. हा वाद इतका वाढला की, या वादाचे रूपांतर हाणामारीत झाले. हा सर्व प्रकार सुरू असताना उपहारगृहाच्या मालकाने पीडित प्रेक्षकाच्या कानाला लचका तोडला. यावेळी उपहारगृहाचा मालक आणि त्याच्या तीन साथीदारांनी पीडिताला जीवे मारण्याची धमकीही दिली. दरम्यान, हा सर्व प्रकार खाद्य पदार्थांच्या पैशाच्या वादातून घडल्याचे पोलिसांनी सांगितले आहे.

नव्या वर्षात केसांची कात्री खिशाला लागणार

देशोन्नती वृत्तसंकलन

मुंबई : २०२४ हे वर्ष संपायला अवघे २० दिवस बाकी आहेत. त्यामुळे नव्या वर्षाचे जोरदार स्वागत करण्यासाठी सर्वसामान्य नागरिकांकडून प्रयत्न होताना दिसत आहे. अशातच सलून आणि ब्युटी पार्लर असोशिएशनने नवीन वर्षात केशकर्तनालय, ब्युटी पार्लर आणि सलूनचे रेट वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे नव्या वर्षात केसांची कात्री नागरिकांच्या खिशाला लागणार आहे. संघटनेने सध्याच्या दरात किमान २० ते ३० टक्क्यांची भाववाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे आता सलून आणि ब्युटी पार्लर असोसिएशन महाराष्ट्र राज्य यांनी सांगितले की, वाढती महागाई, जीएसटी, इन्कम टॅक्स, प्रोफेशनल टॅक्स, महानगरपालिकेची वाढती लायसन फी, सलूनमधील उपयोगी वस्तूंचा वाढते दर, वाढत चाललेले हप्ते या सर्व आर्थिक विवेंचनातून मार्ग काढण्यासाठी दरवाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

शहरी आणि ग्रामीण भागासाठी वेगवेगळी दरवाढ

दरम्यान, महाराष्ट्र नाभिक महामंडळाचे सरचिटणीस दिलीप अनर्थे यांनी सांगितले की, महाराष्ट्रात विविध भागात असलेल्या सलून आणि ब्युटी पार्लर व्यावसायिकांच्या सध्याच्या दरानुसार ही दरवाढ करण्यात येणार आहे. कच्च्या मालाच्या दरात वाढ झाल्याने इंधन दरातही वाढ झाली आहे. ज्याचा फटका सलून व्यावसायिकांना बसत आहे. या सर्व परिस्थितीचा विचार करून २० ते ३० टक्के दरवाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

सलून-ब्युटी पार्लरच्या दरांमध्ये वाढ

१ जानेवारी २०२५ पासून मुंबईसह सर्व महाराष्ट्रातील सलूनमध्ये हेअर कट, शेविंग त्याचबरोबर इतर सर्व सौंदर्य प्रसाधन कामावरती किमान २० ते ३० टक्के दरवाढ करण्यात येणार आहे.

संतोषच्या मारेकऱ्यांना फाशीची शिक्षा द्या !

संतोष देशमुख कुटुंबाच्या भेटीत खा.बजरंग सोनवणे गहिवरले ▸ **बीड जिल्ह्यात शांतता सुव्यवस्थेचा प्रश्न झाला निर्माण** ▸ **१५ डिसेंबर पर्यंत दिला निर्वाणीचा अल्टीमेटम**

खा.बजरंग सोनवणे म्हणाले मास्टमाईंड सुटता कामा नये !

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

केज तालुक्यातील मस्साजोग येथील तरुण सरपंचाचे अपहरण करुन, त्यांना टॉर्चर करीत अमानवीय हत्या घडवून आणली आहे. त्यामुळे या घटनेतील मास्टरमाईंडचा शोध लावून सर्वांना कठोर शिक्षा व्हावी.ज्या कारणासाठी हत्या करण्यात आली, त्या खंडणी प्रकरणातील सर्वच आरोपींना १५ डिसेंबरपर्यंत अटक करण्यात यावी, अन्यथा जनतेचा आक्रोश आटोक्यात ठेवणे अशक्य होईल, असा स्पष्ट इशारा खा.बजरंग सोनवणे यांनी दिला.

दरम्यान खा. बजरंग सोनवणे यांनी दिल्लीहून येताच शुक्रवार (ता.१३) सकाळी पोलीस अधीक्षक यांची भेट घेतली. त्यानंतर त्यांनी मस्साजोग येथे स्वर्गीय संतोष देशमुख यांच्या परिवाराची सांत्वनपर भेट घेऊन आदरांजली वाहिली. केज तालुक्यातील मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येने त्यांचे

कुटुंब उघड्यावर आले आहे. एक तरुण उमदा माणूस अतिशय अमानवीय पद्धतीने जिवंतपणे मारला गेला आहे. त्यामुळे केज पोलिस ठाण्यात या प्रकरणाचे तपास अधिकारी, पोलीस उपअधीक्षक कमलेश मीना यांची भेट घेऊन, पोलिसांच्या हलगर्जीपणाचा जाब विचारत सर्व आरोपींना अटक करण्याची मागणी खा.बजरंग सोनवणे यांनी केली. बीड जिल्ह्यात या अमानुष घटनेच्या निषेधार्थ शांततापूर्ण बंद पाळण्यात आला आहे. जिल्ह्यात प्रचंड संताप व्यक्त होत असून, पोलिस प्रशासनाने त्वरित पावले उचलून दोषींवर कारवाई केली नाही, तर याचा उद्रेक होईल.यासाठी प्रशासनाने तत्काळ न्याय देण्याची भूमिका घ्यावी, केज पोलिसांनी वेळीच पावले उचलली असती तर संतोष देशमुख यांचा जीव गेला नसता, त्यामुळे यानंतर तपास कसलाही हलगर्जीपणा पोलिसांनी करता कामा नये. असे खडेबोल खा.बजरंग सोनवणे यांनी सुनावले. जोपर्यंत संतोष देशमुख यांच्या मारेकऱ्यांना कठोर शिक्षा होत नाही तोपर्यंत आपण शांत बसणार नाही.अशी भूमिका त्यांनी यावेळी स्पष्टपणे बोलून दाखवली.

केज पीआयचे निलंबन कधी?

सवाल: नागरिकांच्या तक्रारी असतांना पाठराखण

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणावरुन रोष दिवसेंदिवस वाढू लागला आहे. अशा परिस्थितीमध्ये ज्या पोलीस ठाण्याच्या हद्दीत ही घटना घडली आहे त्या पोलीस ठाण्यातील पी.आय. सह इतर अधिकाऱ्यांविषयी लोकांच्या प्रचंड तक्रारी आहेत. पोलिसांनी वेळीच दखल घेतली असती तर देशमुख यांची हत्या झाली नसती, असे देखील अनेकांनी बोलून दाखविलेले आहे. पोलीस अधीक्षकांनी या प्रकरणाशी संबंधीत केजचे पी.एस.आय. पाटील यांच्यावर तात्काळ निलंबनाची कारवाई केली. मात्र पी.आय. महाजन यांच्या निलंबनासाठी लांबवालांबवी का केली जात आहे? महाजन यांच्यावर कारवाई करायची नाही का? विनाकारण त्यांना पाठिशी का घातलं जात आहे? असा प्रश्न उपस्थित होऊ लागला आहे. केज पोलीस ठाण्याचे पी. आय. महाजन यांच्याविषयी लोकांमध्ये प्रचंड रोष आहे. संतोष देशमुख हत्या प्रकरणात पोलिसांनी दिरंगाई केल्याचा आरोप सातत्याने होत आहे. या संदर्भात पोलीस अधीक्षक अविनाश बारगळ यांनी स्वतः

मस्साजोग येथील आंदोलकांसमोर बोलतांना पी.एस.आय.पाटील आणि महाजन यांच्याविषयी काही प्रकार कानावर आलेले आहेत, लोकांच्याही या विषयी तक्रारी आहेत. त्यामुळे पाटील यांना निलंबीत करण्यात येत असल्याचे सांगितले. एवढेच नव्हे तर पी.आय. महाजन यांच्यावरील कारवाईचा प्रस्ताव दोन दिवसात पाठविणार असल्याचे स्वतः पोलीस अधीक्षकांनी जमावासमोर सांगितले. ▸पान २ वर...

सुर्यपूत्र यशवंत आंबेडकरांना अभिवादन

ऋणानुबंध: भारतीय बौद्ध महासभेकडून जयंती

माजलगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

भारतीय बौद्ध महासभा माजलगाव यांच्या विद्यमाने सांची बुद्ध विहार डॉ आंबेडकर भवन के कॅम्प येथे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे सुपुत्र,चैत्यभूमीचे शिल्पकार , बौद्धाचार्यांचे जनक सुर्यपुत्र भैय्यासाहेब ऊर्फ यशवंत भिमराव आंबेडकर यांच्या जयंती निमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते या कार्यक्रमाचे अध्यक्ष भारतीय बौद्ध महासभेचे तालुका अध्यक्ष डॉ भागवत साळवे हे होते या कार्यक्रमा साठी भारतीय बौद्ध महासभेचे जिल्हा संस्कार उपाध्यक्ष एस बी मोरे,जिल्हा संस्कार सचिव शामभाऊ वाघमारे वंचित बहुजन आघाडीचे नेते

अंकुश जाधव , केंद्रीय शिक्षिका लिलाताई उजगरे यानी आपले विचार माडले तर या कार्यक्रमास वंचित बहुजन आघाडीचे नेते भारत तांगडे,धम्मानंद साळवे, भारतीय बौद्ध महासभेचे माजी जिल्हा संरक्षण उपाध्यक्ष गुलाब प्रधान ,शेलापुरी चे उपसरपंच नाथाजी घडसे,हे उपस्थित होते या कार्यक्रमाचे प्रस्ताविक मायाताई स्वामी यांनी केले तर आभार बौद्धाचार्य ▸पान २ वर...

पेट परीक्षेत सुभाष सुतारांना यश

गेवराई/पुण्यभूमी प्रतिनिधी

मुंबई विद्यापीठाने घेतलेल्या पीएच.डी प्रवेश पूर्व परीक्षा पेट २०२४ चा निकाल शनिवार दि. ७ रोजी जाहीर करण्यात आला असून, ज्येष्ठ पत्रकार सुभाष अच्युतराव सुतार यांनी या परीक्षेत यश संपादन केले आहे. विशेष म्हणजे, पत्रकारिता विषयात ते पेट पात्र झाले आहेत. त्यामुळे, त्यांना पत्रकारितेत पीएच. डी करण्याची संधी मिळणार आहे.बीड जिल्ह्यातील पत्रकारांनी सुभाष सुतार यांचे अभिनंदन करुन पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

मुंबई विद्यापीठाने सेंटर बेस्ड टेस्ट सीबीटी ऑनलाईन पद्धतीने घेण्यात आलेल्या परीक्षेत महाराष्ट्र राज्यातून ५०४० विद्यार्थी

बसले होते. त्या पैकी २००८ विद्यार्थी पात्र झाले आहेत. एकुण ५३% विद्यार्थी उत्तीर्ण झाल्याचे विद्यापीठाने जाहीर केले आहे. ज्येष्ठ पत्रकार सुभाष सुतार यांनी ही, मुंबई विद्यापीठाने घेतलेल्या पेट परीक्षेत ▸पान २ वर...

ट्रेनी शिक्षक म्हणाले कार्यकाल वाढवा

मागणी: गटशिक्षणाधिकाऱ्यांना निवेदन

माजलगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

मुख्यमंत्री युवा कार्यप्रशिक्षण योजने अंतर्गत कार्यरत (ट्रेनर शिक्षक) हे शासन निर्णयाच्या आधिन राहून, शासन निर्णयाच्या शैक्षणिक अर्हतेनुसार पात्र व पुर्ण वेळ नियुक्त शाळेवर कार्यरत असून, शैक्षणिक वर्षाच्या अनुषंगाने सहा महिन्याचे प्रशिक्षण हे अपुर्ण व अर्धवट होईल. करिता किमान शैक्षणिक वर्ष पुर्ण करण्याची बाब विचाराधीन ठेवून विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान व ट्रेनी (शिकाऊ) शिक्षक यांचे प्रशिक्षण किमान पुर्ण होण्याच्या अनुषंगाने विचार करून आपण ट्रेनी शिक्षक यांना सदरील नियुक्ती शाळेवर किमान एक वर्ष (१२ महिने) प्रशिक्षण मिळावे या मागणीसाठी दि .१२ दिसेबर रोजी माजलगाव गटशिक्षणाधिकारी रवींद्र महामुनी यांना निवेदन देण्यात आले.

सदरील विषयाचा गांभिर्यपुर्वक विचार करून ट्रेनी शिक्षक यांना नियुक्ती शाळेवर शैक्षणिक वर्षाच्या अनुषंगाने किमान एक वर्ष (१२ महिने) एवढा कार्यकाळ वाढवून देण्यात यावा . सदरील विषयावर लक्ष केंद्रीत करून ▸पान २ वर...

गोपीनाथगड येथे केले रक्तदान

भीमाशंकर नावंदे : वैद्यनाथाचेही घेतले दर्शन

परळी/पुण्यभूमी प्रतिनिधी

सामाजिक कार्यकर्ते श्री भीमाशंकर आप्पा नावंदे यांनी गुरुवार, १२ डिसेंबर रोजी परळीतील पंचम ज्योतिर्लिंग श्री वैद्यनाथाच्या मंदिरात पूजा व आरती केली. परंतु याशिवाय, त्यांनी गोपीनाथगड येथे जाऊन लोकनेते स्व. गोपीनाथराव मुंडे यांच्या जयंतीनिमित्त एक महत्त्वपूर्ण सामाजिक कार्य केले.

श्री नावंदे यांनी स्व. गोपीनाथराव मुंडे यांच्या पवित्र समाधीवर जाऊन रक्तदान करून समाजाला एक सशक्त संदेश दिला. याप्रसंगी श्री नावंदे यांनी लोकनेते स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांच्या पत्नी श्रीमती प्रज्ञाताई मुंडे यांचे आशीर्वाद घेतले. यावेळी त्यांनी सांगितले की, रक्तदान हा केवळ एक शारीरिक कृत्य नसून तो समाजाच्या ▸पान २ वर...

'द एम्पॉवर हर फाउंडेशन' चा कार्यक्रम

माणूसकी: तीन मुलींचे स्वीकारणार पालकत्व

पुणे/पुण्यभूमी प्रतिनिधी

समाजातील आर्थिक दृष्टीने दुर्बल मुलींना दर्जात्मक शिक्षणाबरोबरच रोजगाराच्या उत्तमोत्तम संधी मिळवून देऊन त्यातून त्यांचे व त्यांच्या कुटुंबाचे उज्ज्वल भविष्य निर्माण व्हावे यासाठी 'द एम्पॉवर हर फाउंडेशन' या धर्मादाय ट्रस्टची स्थापना करण्यात आली आहे. या वर्षी, आपल्या 'घे भरारी' या योजने अंतर्गत 'द एम्पॉवर हर फाउंडेशन' ही संस्थेच्या गायत्री रावडे, दिया दिघे आणि पियुषा पांडव या तीन मुलींचे कायम स्वरूपी पालकत्व स्वीकारणार आहे. शैक्षणिक शिष्यवृत्ती व्यतिरिक्त, या मुलींचा सर्वांगीण विकास व्हावा या दृष्टीने भर दिला जाणार आहे अशी माहिती संस्थेचे संस्थापक अध्यक्ष संदीप नूलकर यांनी दिली.

रविवार, दि.१५ डिसेंबर २०२४ रोजी सायंकाळी ५.०० वा. सीओईपीच्या एस.एल. किर्लोस्कर सभागृहात या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे.

अध्यक्षस्थानी जगप्रसिद्ध शास्त्रज्ञ पद्मविभूषण डॉ. रघुनाथ माशेलकर असतील. तसेच 'द एम्पॉवर हर फाउंडेशन' च्या संचालिका रूपाली शिंदे-आगाशे, सचिव प्रसिद्ध सिने दिग्दर्शक निपूण धर्माधिकारी आणि कोषाध्यक्ष ऋषिकेश अत्रे उपस्थित राहतील.'घे भरारी' या उक्ती नुसार शहरातील ८ ते १० या वर्गात शिकणार्या मुलींचा सर्वांगीण विकास केला जाणार आहे. या वर्षी पालकत्व स्वीकारण्यात आलेल्या तीन मुलींना त्या आर्थिक दृष्टीने स्वावलंबी होई पर्यंत मदत केली जाणार आहे. ही योजना दर वर्षी अंमलात आणली जाणार आहे. समाजातील आर्थिक दृष्टीने दुर्बल मुलींची जवाबदारी घेणे, त्यांच्या कौशल्य गुणांना वाव देणे, त्यांचे मानसिक आरोग्य सांभाळणे आणी उपजत असलेल्या कला गुणांना वाव देऊन त्यांना सर्वांगिण दृष्टिने सक्षम करण्यासाठी काम केले जाणार आहे.

हेल्थ केअर क्लिनिकडून शिबिर

उपक्रम: मोफत शिबिराचा लाभ घेण्याचे आवाहन

परळी/ पुण्यभूमी प्रतिनिधी

येथील हेल्थ केअर क्लिनिक व जि प. पेन्शनर्स कर्मचारी सहकारी पतसंस्था यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक १५ डिसेंबर २०२४ रोजी परळी शहरात भव्य मोफत बी पी. व शुगर तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

शहरातील आयसीआयसीआय बँकेच्या बाजूला असलेल्या हेल्थ केअर क्लिनिक्स रुग्णालयासमोर १५ डिसेंबर रोजी सकाळी ११ ते २ या वेळेत हे तपासणी शिबिर संपन्न होणार आहे. या शिबिरास प्रमुख उपस्थिती दिव्यांग मंत्रालय मुंबईचे उपाध्यक्ष डॉ. संतोष मुंडे, डॉ. संदीप मंत्री, फिजिशियन अँड सर्जन मुंबई येथील व हेल्थ केअर क्लिनिकचे संचालक डॉ. विनय कराड, बीड जिल्हा पेन्शनर शिक्षक कर्मचारी संघटनेचे जिल्हाध्यक्ष बाबुराव नागरगोजे, व्ही एन. गुट्टे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या शिबिराचा परळी तालुक्यातील गरजवंतांनी आणि नागरिकांनी लाभ घेण्याचे आवाहन ए .तु.कराड व सम्राट गायकवाड यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी ९८ ८१ ८८ १९ १३ तसेच ८६ २४ ०२०३२४ या क्रमांकावर संपर्क साधावा.

डॉ.योगेश क्षीरसागर — बीड आमदाराची चौकशी करा

गोळीबार प्रकरणात आमदाराचा समर्थक

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

जिल्ह्यात कायदा सुव्यवस्था राहिलेली नाही, म्हणत बोंब ठोकणाऱ्या बीडच्या आमदाराशी संबंधित व्यक्ती गोळीबार प्रकरणात आरोपी आहे. अशी प्रकरणे बीड विधानसभा मतदारसंघात आमदाराच्या वरदहस्तामुळे सातत्याने घडत आहेत. त्यामुळे गोळीबार प्रकरणाची सखोल चौकशी करून आमदाराला सहआरोपी करावे, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी पोलिस प्रशासनाकडे केली आहे.

पत्रकात पुढे म्हटले आहे की, मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख खून प्रकरणातील आरोपींना अटक करून कडक कारवाई करावी ही आपली सुरुवातीपासूनच भूमिका आहे. या प्रकरणात बीडच्या आमदाराने राजकारण करत राजकीय भांडवल होईल, अशी विधाने केली. ती विधाने करण्याचा नैतिक अधिकार त्यांनी केव्हाच गमावलेला आहे. गत पाच वर्षात व्यापारी, अधिकारी, कर्मचाऱ्यांना ब्लॅकमेल करण्यापलीकडे त्यांनी दुसरे काहीही केलेले नाही. मागे बीडमध्ये आदित्य कॉलेजजवळ झालेल्या खून प्रकरणात आमदाराचे जवळचे नातलग आरोपी आहेत. दोन-अडीच वर्षापूर्वी

जिल्हा परिषदेचे माजी सदस्य ड.राजेंद्र राऊत यांच्यावर राजकीय दबावातून आमदारांनी खोटी ट्रॉसिटी व ३०७ सारखे गंभीर गुन्हे दाखल करायला लावले. माझ्यासह सहकाऱ्यांवर हनुमंत वाघमारे यांच्याकरवी करायला लावलेली ट्रॉसिटी देखील पूर्णपणे खोटी ठरली. तसेच सतीश पवार यांच्या संपत्तीच्या प्रकरणात वारंवार हस्तक्षेप करून आमदाराने खंडणी गोळा करण्यासाठी गुंड पाठविले. त्यावेळी रजिष्ट्री कार्यालयात ▸पान २ वर...

मस्साजोग खून प्रकरणाचे राजकारण करू नये

केज तालुक्यातील मस्साजोग खून प्रकरणाचे बीडच्या आमदाराने राजकरण करू नये. आरोपींसोबतचे माझे फोटो व्हायरल करून खोटे आरोप केले जात आहे. माझी कोणतीही चौकशी करावी, मी कसल्याही चौकशीसाठी तयार आहे. यात माझा कुठेही संबंध आढळून आल्यास राजकीय संन्यास घेईल. परंतु बीडमध्ये आमदाराचा वरदहस्त असल्यामुळे पवनचक्की कंपन्यांच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांनी शेतकऱ्यांची पिळवणूक केली आहे. त्यामुळे पवनचक्कीच्या प्रकरणात बीडच्या आमदाराचीही कसून चौकशी व्हावी. कॉल डिटेल्स तपासवेत. त्यासाठी ते तयार आहेत का? हे बगलबच्चांनी आमदाराला विचारून स्पष्ट करावे. याबाबत आमदाराने मीडियासमोर पुढे येऊन बोलण्याची तयारी दाखवावी, असे आव्हान डॉ.योगेश क्षीरसागर यांनी दिले आहे.

दुकान फोडून लाखांचे साहित्य चोरले !

दुर्लक्ष: केजमध्ये चोऱ्यांचे प्रमाण वाढले

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

केज शहरातील उमरी रोडवर असलेल्या एका मोटार रिवायडींग च्या दुकानात चोरट्यांनी चोरी करत हातावर पोट असणाऱ्या एका कष्टकऱ्याचे सुमारे अडीच लाखाचे साहित्य घेऊन पोबारा केला आहे. केज तालुक्यातील शिरपूरा येथील सतीश महादेव घुले यांचे केज शहरातील उमरी रोडवर सागर मोटार रिवायडींग चे दुकान आहे. घुले हे नेहमीप्रमाणे दि.१० डिसेंबर रोजी सायंकाळी दुकान बंद करून गावाकडे गेले होते. मात्र ते जेव्हा दिनांक १२ डिसेंबर रोजी परत आले आणि दुकान उघडले, त्यावेळेस दुकानात चोरी झाल्याचे त्यांच्या लक्षात आले. दुकानांमध्ये ठेवलेले कॉपर वायरचे बंडल, गल्ल्या मधील रोख तीन हजार यासह अन्य काही साहित्य मिळून दोन लाख ४० हजार रुपयाचे साहित्य चोरट्याने चोरून नेले. सदरील प्रकरणी सतीश घुले यांनी दिलेल्या तक्रारीवरून केज पोलिसात गुन्हा दाखल झाला असून पोलीस तपास सुरु असल्याचे सांगण्यात आले.